RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क अॅड. सुशीला मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. २८ एप्रिल 2026



1928- उंब्रज, तालुका,कराड, जिल्हा. सातारा महार सेवा संघाची बैठक.
1929 - मुंबई इलाखा महार वतनदारांची परिषद.
1944- मजूर मंत्री डॉ. आंबेडकर बिहारमधील कोडमा परिसरातील खाणीत प्रत्यक्ष उतरून पाहणी केली. संकलन प्रा. यशवंत दुपटे

मंगळवार, २८ एप्रिल २०२६ | वर्ष : ६ | अंक : ११८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 28 April 2026 | Year : 6 | Issue : 118 | Daily | Rate: Rs. 5/-

# महिला असो की पुरुष या दोघांनाची समानता महत्त्वाची : राहुल गांधी

## राहुल गांधींची दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थिनींशी अनौपचारिक चर्चा

**नवी दिल्ली :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींशी विविध विषयांवर संवाद साधला. राहुल गांधींना जेन झेड विद्यार्थिनींनी महिलांचे हक्क, महिला आरक्षण, महिलांचे अधिकार, मणिपूरचा प्रश्न या सगळ्याबाबत प्रश्न विचारले आणि राहुल गांधी यांनी त्यांच्या प्रश्नांची दिलखुलास उत्तरंही दिली. राहुल गांधी यांनी त्यांच्या YouTube चॅनलवर हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. Gen Z विद्यार्थिनी, विद्यार्थी हे आपले भवितव्य आहेत, त्यांचे विचार हे अतिशय स्पष्ट आणि थेट आहेत असे मत राहुल गांधी यांनी व्यक्त केले आहे.

राहुल गांधींशी दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी जेव्हा चर्चा केली तेव्हा साहजिकच त्यांनी प्रश्न विचारला तो महिला आरक्षणाच्या विधेयकाचा. विरोधक हे महिला आरक्षण विरोधी आहेत का? तसेच महिलांकडे एक वस्तू म्हणून पाहिले जाते याबाबत तुम्हाला काय वाटते? असा प्रश्न विचारला असता राहुल गांधी म्हणाले, हे खरे आहे पण



आमचा पक्ष हे कमी प्रमाणात करतो. माझ्यासाठी महिला म्हणजे शिव आणि शक्तीचं स्वरुप आहे. महिला असो की पुरुष या दोघांनाची समानता महत्त्वाची आहे यावर माझा विश्वास आहे. तसेच मला हे वाटतं की महिलांची शक्ती ही पुरुषांपेक्षा अधिक परिणामकारक आहे. महिलांमध्ये पुरुषांच्या तुलनेत काम करण्याची क्षमताही अधिक आहे हे माझे मत आहे, असे राहुल गांधी म्हणाले. तसेच महिला आरक्षण विधेयकावरच्या प्रश्नावर उत्तर देत राहुल गांधी म्हणाले, महिला सशक्तीकरणाचे सर्वात जास्त काम कुणी केले असेल तर ते पंचायत राजने केले आहे हे नाकारता येणार नाही. त्यावर या विद्यार्थिनी म्हणाल्या की महिला सरपंचांचे काम त्यांचे पती पाहतात. त्यावर लगेचच राहुल गांधी म्हणाले की तुम्ही एखादी चांगली गोष्ट केलीत तरीही त्यातून पळवाटा शोधल्या जातातच. पंचायत राजमुळे महिलांना जितका फायदा झाला आहे तितका राजकीय फायदा इतर कुठल्याही गोष्टीमुळे झाला नाही हे मान्य करावं लागेल. शिवाय पंचायत राज हे आम्ही सुरु केले आहे असंही राहुल गांधींनी सांगितले. राहुल गांधी म्हणाले मी जेव्हा या विद्यार्थिनींशी चर्चा केली तेव्हा मला हे समजले की या विद्यार्थिनी उद्याच्या सक्षम महिला आहेत. या सगळ्यांना नुसती आश्वासने नको आहेत, सुरक्षा हवी आहे, बरोबरीने मिळणारी संधी आणि स्त्री पुरुष समानता खऱ्या अर्थाने राबवणारं सरकार हवं आहे. मी जेव्हा या मुलींशी बोललो तेव्हा या सगळ्यांनीच त्यांचं म्हणणे हे अतिशय निर्भिडपणे मांडले ही बाब मला खरेच कौतुकाची आणि अभिमानाची वाटते. या संपूर्ण मुलाखती दरम्यान राहुल गांधी आणि गार्गी महाविद्यालयाच्या मुलींची अनऔपचारिक चर्चा झाली.

# राज्यात तीन महिन्यांत 9259 रस्ते अपघात

### 3858 प्रवाशांचा मृत्यू; दररोज सरासरी 43 जणांचा बळी

**मुंबई :** राज्यात दररोज सरासरी 103 रस्ते अपघात घडत आहेत. प्राणघातक अपघातांची संख्या दैनंदिन सुमारे 40 असून त्यामध्ये दरदिवशी 43 जणांचा अपघाती मृत्यू होतो. परिवहन विभागाने दिलेल्या यावर्षीच्या जानेवारी ते मार्च दरम्यानच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले. मोठ्या संख्येने होणारे अपघात व त्यात होणारी प्राणहानी लक्षात घेता रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह लागले आहे.

**अनेक उपाययोजना, मात्र अपेक्षेप्रमाणे अपघातांवर नियंत्रण नाहीच**

राज्यात रस्ते अपघाताचा गंभीर प्रश्न आहे. आजही दररोज शेकडो अपघात घडत असल्याने त्यावर नियंत्रण मिळवण्याचे मोठे आव्हान परिवहन विभागापुढे उभे ठाकले. दरम्यान, सन 2030 पर्यंत अपघाताची संख्या 50 टक्के कमी करण्याचे उद्दिष्ट परिवहन विभागाने ठेवले आहे. त्यासाठी रस्ता सुरक्षा उपाययोजना केल्या जात आहेत.

## राज्यात रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण चिंताजनक...

राज्यस्तरावर व प्रत्येक जिल्हास्तरावर रस्ता सुरक्षा कक्ष निर्माण केले. प्रत्येक जिल्ह्याची अपघाताची कारणे व तेथील आवश्यकता विचारात घेऊन रस्ता सुरक्षा उपाययोजना आराखडा तयार




करून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. याशिवायही विविध उपाययोजना केल्या जात असल्याचे परिवहन विभागाकडून सांगण्यात आले. राज्यातील अपघातांची संख्या मात्र अपेक्षेप्रमाणे कमी झालेली नाही, ही वास्तविकता नाकारता येणार नाही.

> "राज्यात 2025 मध्ये जानेवारी ते मार्चदरम्यान नऊ हजार 385 रस्ते अपघात झाले असून प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार 878 आहे. यामध्ये चार हजार 179 जणांना आपले प्राण गमवावे लागले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अपघात व मृत्यूच्या संख्येत नाममात्र घट झाल्याचे चित्र दिसून येते.



### तीन महिन्यात 3594 प्राणघातक अपघात

2026 वर्षात जानेवारी ते मार्च महिन्यातील 90 दिवसांच्या आकडेवाडीनुसार, राज्यात नऊ हजार 259 अपघात झाले आहेत. प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार 594 असून त्यामध्ये तीन हजार 858 प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. राज्यात दररोज सरासरी 103 अपघात होत आहेत. दैनंदिन सुमारे 40 प्राणघातक अपघात होत असून त्यामध्ये दरदिवशी 43 जणांचा अपघाती मृत्यू ओढवतो. राज्यातील अपघातांची ही संख्या मोठी असून हजारो नागरिकांचा बळी गेला. सातत्याने होणाऱ्या अपघातांमागे विविध कारणे समोर आली आहेत.

## महत्त्वाच्या बातम्या

### उष्माघाताने महिला शेतकऱ्याचा मृत्यू

**वडगाव आनंद :** सध्या संपूर्ण जुन्नर तालुक्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून, या वाढत्या उष्णतेचा एक भीषण बळी निमगाव सावा येथे गेला आहे. शेतात काम करत असताना अचानक उष्माघाताचा त्रास झाल्याने सौ. रुपाली भाऊ गाडगे (वय अंदाजे 40) या महिला शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे निमगाव सावा गावासह संपूर्ण परिसरामध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निमगाव सावा येथील गावमाळा/माडीमळा परिसरातील रहिवासी असलेल्या सौ. रुपाली गाडगे या आज, सोमवार दि. 27 एप्रिल रोजी सकाळी आपल्या शेतात खुरपणीचे काम करत होत्या. सकाळी 11:45 च्या सुमारास उन्हाची तीव्रता अधिक असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. उष्माघाताचा तीव्र झटका बसल्याने त्या जागीच कोसळल्या. त्यांना तातडीने मदत मिळेपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती. एका कष्टकरी माऊलीचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने गाडगे कुटुंबावर डोंगर कोसळला आहे.

### सुट्टीच्या हंगामामुळे रेल्वे गाड्या 'हाऊसफुल्ल'

**पुणे :** शाळा, महाविद्यालयांना सुट्टी असल्यामुळे गावी जाणाऱ्या प्रवासीसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर गर्दी होत आहे. शिवाय प्रमुख गाड्यांचे तिकीट जूनपर्यंत फुल्ल झाले आहेत. परिणामी, ऐनवेळी सुट्टीच्या हंगामात प्रवासाचे बेत आखणाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे; वाढत्या प्रवाशांमुळे रेल्वेगाड्यांसह स्थानक परिसरही 'हाऊसफुल्ल' झाला आहे. पुणे शहर हे उद्योग, शिक्षण तसेच ऐतिहासिक ठिकाण असल्याने येथे पर्यटकांची मोठी लगबग असते. बाहेरील राज्यातून कामानिमित्त व नोकरीसाठी पुण्यात ये-जा करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे पुणे स्थानकावरून दररोज किमान दीड ते दोन लाख नागरिक प्रवास करतात. परिणामी, एस.टी. बससह रेल्वे प्रवासाला अधिक प्राधान्य देण्यात येत असल्याने येथून तिरूपतीसह मुंबई, दिल्ली, दानापूर, कोलकाता, चेन्नई, गोरखपूर, आदी महत्त्वपूर्ण शहरांत रेल्वेसेवा सर्व प्रवाशांसाठी किफायतशीर आहे.

## शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून राज्यभर गदारोळ

**पुणे :** सध्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून राज्यभरात गदारोळ सुरू आहे. आमदार संजय गायकवाड यांनी या नावावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ केली. त्यानंतर या पुस्तकाविषयी प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. परिणामी सोशल मीडियावर त्याचे 'पीडीएफ' वेगाने वाचले जात आहे. तर पुस्तकाच्या दुकानातूनही त्याची विक्री जोरदार होत आहे. वादामुळे तरी लोकं पुस्तक वाचायला सुरुवात करत आहेत, ही वाचनसंस्कृतीच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. एखाद्या पुस्तकावरून वाद झाला की, त्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. परंतु, सध्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून बराच वादंग सुरू असल्याने त्या पुस्तकाची






मागणीही वाढली आहे. ज्येष्ठ विचारवंत गोविंद पानसरे यांनी 'शिवाजी कोण होता?' ही पुस्तिका लिहिली आहे. त्याची सव्वाशेहून अधिक आवृत्त्या आल्या. खरे तर हे पुस्तक नव्हेच ती एक छोटेखानी, अवघ्या 74 पानांची पुस्तिका आहे. पण त्या पुस्तकातून पानसरे यांनी छत्रपती शिवरायांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. पानसरे यांनी सर्व समज-गैरसमजांना सज्जड पुराव्यानिशी छेद देत, त्यातून हा क्काणता राजा 'कसा सर्व समाजाचा आणि विशेषत- क्कआम आदमी'चा राजा होता, ते दाखवून दिले आहे. दरम्यान, बुकगंगावर देखील पुस्तक उपलब्ध आहे. त्यावर सध्या मोठ्या प्रमाणावर लोक कमेंट करत आहेत. इतर अनेक ऑनलाइन संकेतस्थळवरूनही या पुस्तकाची विक्री होत आहे.

## पानसरेंविरुद्ध 'मरणोत्तर गुन्हा' दाखल करा, प्रकाशकाला अटक करा : संजय गायकवाड




**बुलढाणा :** कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी सुमारे 37 वर्षांपूर्वी लिहिलेल्या आणि प्रशांत आंबी यांनी प्रकाशित केलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून निर्माण झालेला वाद आमदार संजय गायकवाड यांच्या दिलगिरी नंतर आणि कोल्हापूर येथे (अदखलपात्र का होईना) गुन्हा दाखल झाल्याने शांत होईल असा अंदाज होता. मात्र तो साफ चुकीचा ठरलाय! बुलढाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी सोमवारी (27 एप्रिल) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. यात लेखक दिवंगत गोविंद पानसरे यांच्यावर मरणोत्तर गुन्हा दाखल करण्यात यावा, पुस्तकास विदेशातून आर्थिक मदत मिळाली आहे का हे तपासावे, तसेच पुस्तक छापणाऱ्या, विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख असलेल्या आणि लेखकाच्या मृत्युनंतर पुस्तक छापाई करणाऱ्या प्रकाशक प्रशांत आंबी याला अटक करावी, अशी मागणी करण्यातत आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान असून त्यांच्या नावाचा वापर करून काही लेखक व प्रकाशक आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाद्वारे महाराजांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

## हापूर जिल्ह्यातील भीषण आगीत तब्बल 70 झोपड्या जळून खाक

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील हापूर जिल्ह्यात भीषण आग लागली आहे. या आगीत तब्बल 70 झोपड्या जळून खाक झाल्या. पिलखुवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोदीनगर रोडवरील एका कापड कारखान्याजवळ असलेल्या झोपडपट्टीत सकाळी ही आग लागली. आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. ही आग इतकी भीषण होती की ती आसपासच्या गोदामांपर्यंत आणि कारखान्यांपर्यंत पसरली, ज्यामुळे सर्वत्र भीतीचं वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. हापूरपासून पिलखुवा येथील अर्जुननगरचे अंतर 10 किलोमीटर आहे. या आगीचे भीषण स्वरूप इतकं होते की, धुराचे लोट 10 किलोमीटर अंतरावरूनही स्पष्टपणे दिसत होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी 9 च्या सुमारास झोपड्यांमध्ये असलेले प्लास्टिक, पॉलिथिन, लाकूड आणि भंगार यांसारख्या ज्वलनशील पदार्थांमुळे आग अधिकच भडकली. ही आग पसरत जाऊन जवळच असलेल्या 'गायत्री लॉजिस्टिक ट्रान्सपोर्ट', 'युनायटेड ट्रान्सपोर्ट' आणि एका जीन्स शिवण्याच्या कारखान्यापर्यंत पोहोचली. गोदामांमध्ये असलेला मोठ्या प्रमाणावरील कापडाचा साठा जळून खाक झाला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व लोकांना सार्वभौम बनविले : निरंजन टकले



**नागपूर :** विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील सर्व नागरिकांना सार्वभौम बनविले. आपल्या देशाच्या राज्यघटनेची उद्देशिका केवळ एका वाक्याची आहे. या उद्देशिकेमध्ये मध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार , अभिव्यक्ती, विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंर्त्य, दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा व व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वाषण देणारी बंधुता याचा स्पष्ट उल्लेख असून ही राज्यघटना लोकांनीच स्वतःप्रत अर्पण केली आहे. हे डॉ.आंबेडकरांचे आधुनिक भारताच्या निर्मितीत अतिशय मौलिक योगदान आहे, असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार आणि सुप्रसिद्ध विचारवंत निरंजन टकले यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त नागरी जयंती समितर्फे कामठी रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित जयंती कार्यक्रमात 'आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान' या विषयावर निरंजन टाकले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार डॉ. नितीन राऊत होते. यावेळी डॉ. साजिया खान, गोंडवाना ट्रायबल फाउंडेशनचे आर.डी. आत्राम, डॉ. आंबेडकर संयुक्त नागरी जयंती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. बी.एस. गेडाम, डॉ. अशोक उरकुडे. बानाईचे अध्यक्ष अरविंद गेडाम, बाहोचे अध्यक्ष डॉ. संजय रामटेके, राजेश लोखंडे, डॉ. राजकुमार कोसे, सुरेश तामगाडगे उपस्थित होते. निरंजन टकले पुढे म्हणाले कि, डॉ. आंबेडकरांनी आम्हाला 'शिका! संघटीत व्हा! संघर्ष' हा अमोल संदेश दिला. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही लोकशाही मुल्ये दिलीत. परंतु आज या मुलभूत मूल्यांवरच थेट हल्ला होत आहे. घटनादत्त अधिकारांच्या वापरापासून बहुजनांना वंचित ठेवण्याचा घाट घातला आहे.

डॉ. नितीन राऊत यांनी आपल्या भाषणात सांगितले कि, अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण करून जाती-जातींमध्ये भांडणे लावण्याचा घाट सरकारने रचला आहे. या उपवर्गीकरणाचा आम्ही तीव्र निषेध कारतो. त्यासाठी आम्ही या रस्त्यावर उतरून संघर्ष करणार. कार्यक्रमाचे संचालन डॉ. चंद्रशेखर गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. सूचित बागडे यांनी मानले.यावेळी बहुजन सौरभचे संपादक अॅड. डॉ.सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक संध्या राजूरकर, पत्रकार चंद्रकांत वानखेडे, डॉ. सिद्धिकी अन्वर,डॉ. प्रशांत कडू, साहित्यिक आणि नागपुरातील अनेक मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व डॉ. रूपा कुळकणी यांच्या 'बोधिपर्व' गौरवग्रंथाचे वाढदिवशी प्रकाशन

**नागपूर :** समाजसेवा, वक्तृत्व, लेखन, अध्यापन, संगीत आणि शोषित-पीडितांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या संस्कृत विदुषी डॉ. रूपा कुळकर्णी या खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि लोकसंपर्काच्या धनी आहेत, असे प्रतिपादन डॉ. पंकज चांदे यांनी केले.



डॉ. रूपा कुळकर्णी यांच्या 82 व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित 'बोधिपर्व' या गौरवग्रंथाचे सोमवार, 27 एप्रिल रोजी त्यांच्या रामनगर येथील तिरुपती अपार्टमेंट निवासस्थानी छोटेखानी कौटुंबिक सोहळ्यात विमोचन करण्यात आले. प्रकृती अस्वस्थतेमुळे कार्यक्रम मर्यादित स्वरूपात ठेवण्यात आला. सोहळ्यादरम्यान ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

विमोचन कार्यक्रमाला डॉ. पंकज चांदे यांच्यासह अॅड. आशुतोष धर्माधिकारी, भदंत नागदिपंकर, प्रा. डॉ. देविदास घोडेस्वार, डॉ. राजाभाऊ टांकसाळे, डॉ. अरूणा पाटील, विलास भोंगाडे, सुजाता भोंगाडे, जयदीप हर्डीकर आदी उपस्थित होते.

डॉ. चांदे यांनी आपल्या मनोगतात डॉ. रूपा यांच्या विद्यार्थी दशेपासून ते संस्कृत विभागात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. 'त्या उत्कृष्ट वक्त्या आणि लेखिका असून त्यांच्या समाजसेवेची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. मोलकरीण, हुंडाबळी महिला, कामगार आणि असंघटित वर्गासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला,' असे ते म्हणाले. संविधान तज्ज्ञ प्रा. डॉ. देविदास घोडेस्वार यांनी सांगितले की, 'अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढून संघर्षाची नवी परिभाषा निर्माण करणाऱ्या डॉ. रूपा या बुद्धीवाद्यांचे खरे रोल मॉडेल आहेत.' डॉ. राजाभाऊ टांकसाळे यांनी 'त्यांच्या जीवनावरील 'बोधिपर्व' ग्रंथातून प्रेरणा मिळते. अनेक क्षेत्रांत प्राविण्य मिळवून त्यांनी समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले,' असे नमूद केले.

गौरवग्रंथ समितीचे प्रकाशक नरेश वाहाणे, सुजाता भोंगाडे तसेच डॉ. रूपा यांची देखभाल करणाऱ्या छाया चवरे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रारंभी भदंत नागदिपंकर यांनी बुद्धवंदना घेतली. प्रास्ताविकासह त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा विलास भोंगाडे यांनी मांडला. संचालन भीमराव वैद्य यांनी केले, तर आभार प्रेमकुमार उके यांनी मानले. कार्यक्रमाला एन.टी. मेश्राम, बंटी उके, संजय रेवतकर, केवल जीवनतारे, योगेश चिवंडे, आनंद डेकाटे, रवी गजभिये, डॉ. विनोद डोंगरे, अमन सोनटक्के, निरंजन पाटील, मनोज शेंडे आदी उपस्थित होते.

### 'बोधिपर्व' बंडखोर विचारविश्वाचा लेखाजोखा : डॉ. यशवंत मनोहर

डॉ. यशवंत मनोहर यांच्या संदेशाचे वाचन आनंद डेकाटे यांनी केले. संदेशात ते म्हणतात, 'बोधिपर्व हा तुमच्या बंडखोर विचारविश्वाचा आणि क्रांतिकारी चळवळीचा लेखाजोखा मांडणारा कृतज्ञताग्रंथ आहे. हा आधुनिक 'रूपा बोधी'चा महाकोश असून तुमच्या कार्याची सामूहिक महाबखर आहे.' या संदेशाचे वाचन आनंद डेकाटे यांनी केले.

### संधी मिळाल्यास अधिक काम करणार : डॉ. रूपा कुळकर्णी

आरोग्याच्या काही तक्रारी असल्या तरी संधी मिळाल्यास समाजासाठी आणखी काम करण्याची इच्छा असल्याचे डॉ. रूपा कुळकर्णी यांनी व्यक्त केले. 'मोलकरीण, हुंडाबळी महिला आणि असंघटित कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करता आले. समाजसेवा हीच माझी खरी आस्था राहिली,' असे त्या म्हणाल्या.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या !

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

"आपले ध्येय नेहमी मोठे ठेवा.
त्याच्यामुळे उंची मिळते..."



## बहुजन सौरभ संपादकीय

# लोकशाही की सत्ताकेंद्रीकरण?

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सत्तांतर, आघाड्या, फुटीरता आणि पुनर्रचना या गोष्टी नवीन नाहीत. पण अलीकडच्या काळात जे घडते आहे, त्याचा वेग, पद्धत आणि परिणाम यामुळे परिस्थिती अधिक चिंताजनक बनली आहे. एका पक्षातील निवडून आलेले खासदार दुसऱ्या सत्ताधारी पक्षात वळवणे ही केवळ राजकीय रणनीती नसून लोकशाहीच्या गाभ्यावरच घाव घालणारी प्रक्रिया आहे. जनतेने एका विचारसरणीला मत दिलेले असताना, त्या प्रतिनिधींनी दुसऱ्या विचारसरणीकडे वळणे म्हणजे मतदारांच्या विश्वासाचा सरळ विश्वासघात होय. आज सत्तेच्या केंद्रस्थानी असलेली नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांची जोडी देशात राजकीय समीकरणे बदलण्यात पारंगत ठरली आहे. संघटनात्मक ताकद, आर्थिक साधने आणि तपशीलवार निवडणूक व्यवस्थापन यांचा वापर करून विरोधी पक्षांची पाळेमुळे कमकुवत करणे ही त्यांची स्पष्ट रणनीती दिसते. ही बाब फक्त एखाद्या पक्षाच्या यशाची नाही, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेच्या संतुलनावर परिणाम करणारी आहे. इतिहासाकडे पाहिले तर 1975 मधील इमर्जन्सी इन इंडिया हा काळ भारतीय लोकशाहीसाठी सर्वात मोठा धक्का होता. त्यावेळी सत्ता केंद्रीकरण, विरोधकांचे दमन, माध्यमांवर नियंत्रण या गोष्टी उघडपणे घडल्या. आज परिस्थिती तशी उघड नाही, पण पद्धती अधिक सूक्ष्म आणि प्रभावी आहेत. आज विरोधी पक्ष मोडीत काढण्यासाठी थेट दडपशाहीपेक्षा राजकीय फोडाफोडीचा मार्ग अधिक वापरला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आज विरोधी पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पण दुर्दैवाने विरोधी पक्ष स्वतःच्या अंतर्गत मतभेद, नेतृत्वाच्या स्पर्धा आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा यामध्ये अडकलेले दिसतात. राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे आवाज त्यांच्या स्वतःच्या आघाडीतूनच येतात. अशा परिस्थितीत एकसंध लढा उभारणे कठीण होते. 'इंडिया' आघाडी ही संकल्पना आशादायक होती, पण तिचे वास्तवात रूपांतर होण्यासाठी आवश्यक असलेले शिस्तबद्ध नेतृत्व आणि परस्पर विश्वास दिसून येत नाही. तृणमूल, आप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, हे सर्व पक्ष जर खरोखरच सत्तेच्या केंद्रीकरणाला थोपवू इच्छित असतील, तर त्यांनी आपापसातील अहंकार बाजूला ठेवणे अत्यावश्यक आहे. नेतृत्व कोणाचे असावे हा प्रश्न गौण ठरवून 'विचारांचे नेतृत्व' महत्त्वाचे ठरवले पाहिजे. आज देशातील निवडणूक प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. ईव्हीएमवर अविश्वास व्यक्त करणारे अनेक विरोधी पक्ष आहेत. जरी न्यायालयांनी आणि निवडणूक आयोगाने वारंवार ईव्हीएम सुरक्षित असल्याचे सांगितले असले, तरी जनतेच्या मनातील शंका दूर करण्यात अपयश आले आहे. पारदर्शकतेसाठी मतपत्रिकेचा पर्याय पुन्हा विचारात घेणे हा वादाचा विषय असला, तरी त्यावर खुलेपणाने चर्चा होणे गरजेचे आहे. माध्यमांची भूमिकाही या संदर्भात तितकीच महत्त्वाची आहे. एकेकाळी सत्तेवर कठोर प्रश्न करणारी माध्यमे आज मोठ्या प्रमाणात सरकारच्या बाजूने झुकलेली दिसतात, असा आरोप वारंवार होतो. जर चौथा स्तंभच कमकुवत झाला, तर लोकशाहीचे संतुलन ढासळणे अपरिहार्य ठरते. महाराष्ट्रासारख्या राज्यात आपण याचे जिवंत उदाहरण पाहिले आहे. निवडून आलेल्या सरकारची फूट, आमदारांची उलथापालथ आणि त्यानंतरचे सत्तांतर, या सर्व घटनांनी लोकशाही प्रक्रियेबद्दल सामान्य जनतेच्या मनात प्रश्न निर्माण केले आहेत. हीच पद्धत राष्ट्रीय स्तरावर अधिक आक्रमकपणे वापरली जात असल्याची भावना निर्माण होत आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहिले तर हंगेरीमध्ये विक्टर ऑरवेब यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही हळूहळू एकाधिकारशाहीकडे वळल्याचे अनेक अभ्यासक सांगतात. निवडणुका होतात, पण सत्तेचा वापर करून विरोधकांना कमकुवत केले जाते, माध्यमांवर प्रभाव टाकला जातो आणि संस्थांची स्वायत्तता कमी केली जाते. भारतातही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते, ही भीती निराधार नाही. या सर्व पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांसमोर स्पष्ट पर्याय आहे. एकतर ते एकत्र येऊन मजबूत, विश्वासार्ह आणि पर्यायी राजकीय मॉडेल उभे करणार, किंवा हळूहळू राजकीयदृष्ट्या अप्रासंगिक होत जाणार. जनतेला फक्त सरकारविरोधी घोषणाबाजी नको आहे; त्यांना स्पष्ट धोरणे, विकासाचा आराखडा आणि विश्वासार्ह नेतृत्व हवे आहे. विरोधी पक्षांनी आता खालील गोष्टींवर तातडीने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. एकसंध नेतृत्व किंवा किमान समन्वय यंत्रणा निर्माण करणे सामान्य जनतेच्या प्रश्नांवर केंद्रित अजेंडा तयार करणे, माध्यमांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी पर्यायी प्लॅटफॉर्म उभारणे, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी ठोस भूमिका घेणे. शेवटी, लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती मजबूत विरोधकांवर, स्वतंत्र संस्थांवर आणि जागरूक जनतेवर टिकते. जर विरोधी पक्षांनी आजही वेळ वाया घालवला, तर उद्या त्यांच्यासाठी राजकीय अस्तित्व टिकवणेही कठीण होईल. आजची वेळ ही आत्मपरीक्षणाची नाही, तर निर्णायक कृतीची आहे. जनतेचा विश्वास परत मिळवण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येणे, स्पष्ट भूमिका घेणे आणि निर्भीडपणे लढणे हाच एकमेव मार्ग आहे. अन्यथा इतिहास त्यांना माफ करणार नाही. ■ ■

---

**बौद्ध पत्रकारिता ही एक साधना आहे. तिच्याकडे केवळ व्यवसायिक कौशल्य म्हणून बघू नये. तो आर्य अष्टांगिक मार्ग आहे. जो तथागत गौत्तम बुद्धाने सांगितला. हा दुःख निरोधाचा प्रत्यक्ष मार्ग आहे. हा मार्ग आठ पायऱ्यांचा आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी. आजच्या सनसनाटी, फेक न्यूज आणि द्वेषपूर्ण मीडिया युगात बौद्ध पत्रकारिता या अष्टांगिक मार्गाने चालते. ती केवळ बातम्या सांगत नाही, तर समाजाचे दुःख कमी करते. सत्य उजेडात आणते. वाचकाच्या हृदयात करुणा, शांती आणि बदलाची प्रेरणा निर्माण करते.**



# अष्टांगिक मार्ग

ही पत्रकारिता प्रभावी असते कारण ती सखोल, नैतिक आणि दीर्घकालीन दृष्टी देते. परिणामकारक असते. कारण ती केवळ माहिती देत नाही. तर कृतीला आणि अंतर्मनातील परिवर्तनाला प्रेरित करते. ती भावनिक असते. ती राग किंवा घृणा न पसरवित नाही. करुणा आणि मैत्रीच्या सागराकडे वाचकाला नेते. ती साहित्यिक असते. तिची भाषा हृदयस्पर्शी असते. जसे एखाद्या बोधिसत्त्वाच्या कथेसारखी. आज सोशल मीडिया द्वेषाचे जाळे विणतो. ब्रेकिंग न्यूज भीती विकते. पत्रकारिता नफ्याची गुलाम बनली आहे. येथे बौद्ध अष्टांगिक मार्ग एक दिवा आहे. तो पत्रकाराला सांगतो. तू फक्त रिपोर्टर नाहीस. तू दुःखमुक्तीचा दूत आहेस.

**1. सम्यक दृष्टी-(सत्याचे स्पष्ट दर्शन) :-** सम्यक दृष्टी म्हणजे अंधारातून सत्य पाहणे. पूर्वाग्रह सोडणे. चार आर्यसत्यांची गहनता समजणे. बौद्ध पत्रकार दुःख फक्त बातमी म्हणून पाहत नाही. तर दुःखाचे मूळ कुठे आहे. त्याचे स्वरूप कसे आहे. त्याची मुक्ती कशी करता येईल. हे अगोदर समजून घेतो. कल्पना करा. एखाद्या महानगरातील झोपडपट्टीला आग लागली. या आगीची बातमी. सामान्य पत्रकारिता ती 'ट्रॅजिक' हेडलाइन देईल. रडणाऱ्या मुलांचे फोटो छापेल. टीआरपी कमवेल. पण बौद्ध पत्रकार सम्यक दृष्टीने पाहतो. तो पाहतो. ही आग केवळ अपघात नाही. ती गरिबीचे कारण आहे. तिला सरकारी दुर्लक्ष कारणीभूक आहे. यंत्रणेच्या भ्रष्ट विकासाच्या तृष्णेचे फळ आहे. तो वस्तुस्थिती सांगतो. त्यासोबत मानवी कथा सांगतो. ती आई जिच्या कुशीत मूल जळून खाक झाले. तिच्या डोळ्यातील ती वेदना केवळ तिची नाही. ती संपूर्ण समाजाच्या अज्ञानाची आहे. ही दृष्टी प्रभावी असते. कारण ती सुपरफिशियल नसते. ती परिणामकारक असते. कारण वाचकाला फक्त माहिती मिळत नाही. तर अंतर्दृष्टी मिळते. भावनिक शैलीत ती लिहिली जाते. रात्रीच्या अंधारात जळणाऱ्या झोपड्यांमध्ये केवळ लाकडे नव्हती. स्वप्ने जळत होती. गरीबांच्या, मजुरांच्या, आई-बापांच्या. ही भाषा हृदयाला स्पर्श करते. राग निर्माण करत नाही, तर करुणा जागृत करते.

**2. सम्यक संकल्प - (शुद्ध हेतू) :-** सम्यक संकल्प म्हणजे लोभ, द्वेष किंवा प्रसिद्धीचा हेतू न ठेवता, केवळ सत्य आणि करुणेच्या हेतूने पत्रकारिता करणे. बौद्ध पत्रकार स्वतःला विचारतो. मी ही बातमी का लिहितोय? पीडिताला न्याय मिळावा म्हणून की माझ्या चॅनेलला रेटिंग मिळावे म्हणून? आज अनेक पत्रकार राजकीय पक्ष किंवा मालकांच्या इच्छेनुसार लिहितात. त्यांचा हेतू सत्ता, पैसा किंवा बदनामी असतो. पण बौद्ध पत्रकारिता येथे वेगळी आहे. तिचा हेतू दुःख कमी करणे असतो. एखाद्या भ्रष्टाचाराच्या बातमीत तो केवळ नेत्याला किंवा अधिकाऱ्याला बदनाम करत नाही. तर प्रणालीतील तृष्णा उघड करतो आणि समाधानाचे मार्ग सुचवतो. लेखणीचा उद्देश केवळ रक्त सांडणे नाही तर घाव भरून काढणे आहे. मी लिहितोय कारण मला त्या गरिबाची, झोपडपट्टीधारकाची जी आगीत जळाली. त्या शेतकऱ्याची व्यथा सहन होत नाही. ज्याच्या शेतात कारखान्याने विषारी पाणी सोडले. ही शैली परिणामकारक असते. कारण वाचकाला प्रेरणा मिळते. तो फक्त वाचत नाही, तर विचार करतो. मीही काहीतरी करू शकतो.

**3. सम्यक वाणी - (सत्य, करुणामय आणि उपयुक्त बोलणे) :-** बौद्ध धर्मात वाणी ही शक्ती आहे. सम्यक वाणी म्हणजे सत्य बोलणे. पण त्यात करुणा असणे, द्वेष नसणे, अफवा न पसरवणे आणि वाचकाला उपयुक्त असणे. आजच्या पत्रकारितेत हेडलाइन्स 'शॉकिंग', 'एक्सपोज्ड', 'ब्रेकिंग' असतात. भाषा द्वेषपूर्ण, विभाजक असते. बौद्ध पत्रकारिता याला नाकारते. ती सत्य सांगते, पण मऊ भाषेत. 'पोलिसांनी गोळीबार केला' ऐवजी 'अन्यायाच्या भीतीने रस्त्यावर उतरलेल्या तरुणांच्या छातीत गोळ्या घुसल्या. ज्यामुळे आईंच्या डोळ्यातील अश्रू थांबत नाहीत. ही वाणी प्रभावी असते कारण ती विश्वास निर्माण करते. परिणामकारक असते कारण ती द्वेष वाढवत नाही, तर संवादाला प्रोत्साहन देते. साहित्यिक शैलीत ती काव्यसारखी वाटते. शब्द हे तलवारीसारखे आहेत. ते जखमा करू शकतात किंवा मलम लावू शकतात. बौद्ध पत्रकार तलवार नव्हे, मलम बनतो. उदाहरणार्थ, जातीय दंगलीच्या रिपोर्टिंगमध्ये बौद्ध पत्रकार दोन्ही बाजूंना करुणेने पाहतो. तो हिंसकांना दोष देतो, पण त्यांच्या अज्ञानालाही. द्वेषाने भरलेले मन हे स्वतःचे दुःख आहे, असे तो लिहितो. यामुळे वाचक राग करत नाही, तर विचार करतो.

**4. सम्यक कर्म- (नैतिक कृती) :-** सम्यक कर्म म्हणजे अहिंसा होय. चोरी न करणे. व्यभिचार टाळणे. पत्रकारितेच्या संदर्भात म्हणजे पीडितांचा आदर करणे. गोपनीयता राखणे. फोटो/व्हिडिओतून शोषण टाळणे. बौद्ध पत्रकार पीडित मुलीचा चेहरा ब्लअर करतो. तिची कहाणी तिच्या संमतीने सांगतो. तो भडक, सनसनाटी फोटो टाळतो. तो 'स्कूप' साठी सत्याचा बळी देत नाही. त्याचे कर्म उपकारक असते. कॅमेरा हा शस्त्र असू शकतो. तो जखमेवर मीठ चोळू शकतो. मलम लावू शकतो. बौद्ध पत्रकार कॅमेरा हातात घेतो. पण हृदयात करुणा ठेवतो. हेच पथ्य बातमीत पाळतो.

**5. सम्यक आजीविका- (नैतिक उपजीविका) :-** पत्रकारिता ही नफ्याची नव्हे, सेवेची आजीविका असावी. बौद्ध पत्रकार जाहिरातींसाठी सत्य विकत नाही. राजकीय दबावाखाली लिहित नाही. तो स्वतंत्र राहतो. आज अनेक माध्यमे मालकांच्या हितसंबंधांना प्राधान्य देतात. बौद्ध पत्रकारिता याला विरोध करते. माझी पेन ही सत्याची सेविका आहे. कोणत्याही सिंहासनाची गुलाम नाही. असा त्याचा संकल्प असतो. ही आजीविका परिणामकारक असते. ती दीर्घकाळ टिकते. ती लोकांचा विश्वास कमावते.

**6. सम्यक व्यायाम- (सतत प्रयत्न) :-** सम्यक व्यायाम म्हणजे चुकीच्या गोष्टी दूर करणे. चांगल्या गोष्टी वाढवणे. पत्रकारितेत म्हणजे फेक न्यूज टाळणे. सखोल संशोधन करणे. बातमीची घाई न करणे. बौद्ध पत्रकार घाईघाईच्या ब्रेकिंग न्यूजला नाकारतो. तो तथ्य तपासतो. अनेक स्रोत तपासतो. त्याचे प्रयत्न अथक असतात. सत्य शोधणे हे ध्यानासारखे आहे. त्यासाठी धीर, एकाग्रता आणि सातत्य लागते.

**7. सम्यक स्मृती - (जागरूकता) :-** सम्यक स्मृती म्हणजे प्रत्येक क्षणी जागरूक राहणे. बौद्ध पत्रकार प्रत्येक बातमी लिहिताना स्वतःला विचारतो. हे सत्य आहे का? हे करुणामय आहे का? हे उपयुक्त आहे का? सजग पत्रकारिता ह संकल्पना यावरच आधारलेली आहे. ती सोशल मीडियाच्या लाईक्सच्या मागे धावत नाही. ती वर्तमान क्षणात राहते. सखोल दृष्टीकोणातून बघते. ही स्मृती प्रभावी असते. कारण ती चुका कमी करते. गुणवत्ता वाढवते. भावनिक शैलीत असते. पेन उचलण्यापूर्वी श्वासाकडे पाहतो. श्वास शांत असेल तर शब्द शांत आणि सत्य असतील.

**8. सम्यक समाधी - (एकाग्रता) :-** सम्यक समाधी म्हणजे मन एकाग्र करणे. पत्रकारितेत एका विषयावर सखोल मग्न होणे. सुपरफिशियल रिपोर्टिंग टाळणे. बौद्ध पत्रकार दीर्घकालीन मुद्द्यांवर काम करतो. जलवायू बदल, मानसिक आरोग्य, सामाजिक न्याय. तो एकाग्रतेने संशोधन करतो. त्याचे लेख केवळ बातमी न राहता, कथा बनतात. ज्यामध्ये वाचक स्वतःला पाहतो. बौद्ध पत्रकारितेचे व्यावहारिक प्रभाव दिसतो. अनेक शिक्षकांनी पत्रकारांना सांगितले, तुम्ही सजग राहा, कारण तुमचे शब्द लाखो मनांवर परिणाम करतात. भारतात डॉ. आंबेडकरांच्या 'मूकनायक' व अन्य वृत्तपत्रांत सम्यक वाणी आणि सम्यक कर्म दिसते. ते दलितांच्या दुःखाला आवाज देतात. पण द्वेष पसरवत नाही. आजच्या डिजिटल युगात बौद्ध पत्रकारिता सोशल मीडियावरही लागू होते. एक पोस्ट लिहिताना पत्रकार विचारतो, हा ट्विट करुणा वाढवतोय की द्वेष? ही पत्रकारिता परिणामकारक असते. कारण ती समाजात शांती निर्माण करते. भावनिक असते कारण ती वाचकाला 'बोधिसत्त्व' बनवते. दुसऱ्यांचे दुःख संपविण्यास लोक जागृत पत्रकाराचे शब्द भावनिक असतात. साहित्यिक शैलीत असतात. त्यांची बातमी लेख कादंबरीसारखे वाटते. रस्त्यावर पडलेला रक्ताचा थेंब..! केवळ एक थेंब नव्हता. तो हजारो वर्षांच्या अन्यायाचा साक्षीदार होता. पण त्या थेंबातून उगवणारा फुल बनतो. बौद्ध पत्रकार असे क्षण शोधतो. अन्याय संपविण्याची आशा बाळगतो. न्यायाचा मार्ग दाखवितो. बौद्ध पत्रकारिता अष्टांगिक मार्गाने चालते. तेव्हा ती केवळ चौथा स्तंभ राहत नाही. तर धर्मचक्र बनते. ती दुःख ओळखते. दुःखाचे मूळ कापते. निरोध दाखवते. न्यायाच्या मार्गावर नेते. आज जेव्हा मीडिया विश्वास गमावतोय. तेव्हा ही पत्रकारिता नवीन आशा आहे. प्रत्येक पत्रकाराने स्वतःला विचारावे. माझी दृष्टी सम्यक आहे का? माझी वाणी करुणामय आहे का? माझी आजीविका शुद्ध आहे का? जर पत्रकारिता या आठ पायऱ्यांवर उभी राहिली. तर ती केवळ बातम्या देणारी राहणार नाही. समाजाचे प्रबोधन करणारी ठरेल. करुणा जागृत करणारी आणि मुक्तीचा मार्ग दाखवणारी बनेल. बुद्धांच्या शब्दांत, जो मार्ग चालतो, तोच प्रकाश पसरवतो. बौद्ध पत्रकारिता ही केवळ पेन आणि कागदाची नाही. ती हृदयाची आणि मनाची साधना आहे. ती प्रभावी, परिणामकारक, भावनिक आणि साहित्यिक आहे. कारण ती सत्य, करुणा आणि शांतीची भाषा बोलते. ■ ■

**बौद्ध पत्रकारिता-२**



भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019

---

# स्मरण 'भीमगाथा'काराचे

**मराठी भाषेतील निर्भीड पत्रकार, साहित्यिक, स्वातंत्र्यसैनिक नारायण आठवले उर्फ अनिरुद्ध पुनर्वसू यांनी 1960च्या दशकात लिहिलेल्या 'भीमगाथा'ने अवघा महाराष्ट्र भारावून गेला होता. आज, 28 एप्रिल 'भीमगाथा'काराचा स्मरणदिन त्यानिमित्ताने...**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या जीवन आणि कार्यावर आजपावेतो हजारो, लाखो कविता, गीत, अभंग अन् पोवाडे रचले गेले आणि ते येणाऱ्या कित्येक पिढ्यांपर्यंत लिहिले जातील हे जगाचे आश्चर्य नव्हे काय? केवळ आंबेडकरी अनुयायांनीच नव्हे तर गैर बौद्धधर्मीयांनीसुद्धा डॉ. बाबासाहेबांच्या हिमालयासम उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन आपल्या सजग लेखणीतून त्यांना विनम्र अभिवादन केले आहे. त्यात पहिला आंबेडकर जयंती विशेषांक काढणारे आचार्य अत्रे, 1956च्या धम्मक्रांतीने पुलकित होऊन 'धर्मपदा'ची रचना करणारे अनंत रामचंद्र कुळकर्णी, नागपुरातील पहिले बुद्धचरित्रकार भांबूरकर, आंबेडकर चरित्रकार लिहिणारे धनंजय कीर तसेच संस्कृत भाषेत डॉ. बाबासाहेबांवर काव्यगाथा लिहिणारे 'अभंग धर्मपदा'चे लेखक प्रख्यात संस्कृत पंडित श्री. भा. वर्णेकर गुरुजी यांचेही अतिशय मोलाचे योगदान राहिले आहे. त्याच परंपरेत लोकाभिमुख पत्रकार नारायण गजानन आठवले उर्फ अनिरुद्ध पुनर्वसू यांचेही नाव अत्यंत आदरणीय असेच आहे. अनिरुद्ध पुनर्वसू यांनी 1960च्या दशकात लिहिलेल्या 'भीमगाथा'ने एक नवा इतिहास घडविला. शंभर कवनातून चार-चार ओळींच्या या 'भीमगाथा'ने अवघा महाराष्ट्र प्रभावित झाला होता. अतिशय सौंदर्यमय आणि अर्थपूर्ण शब्दरचनेची सुमनांजली त्यांनी गाथेतून डॉ. बाबासाहेबांना भक्तिभावाने अर्पण केली. प्रत्येक भीम अनुयायाच्या ओठातून या गाथेचे मंजुळ स्वर ओसंडून वाहत होते. अनिरुद्ध पुनर्वसू म्हणतात -

*'गाथा गाऊ भिमाची, दलितांच्या देवाची*
*भारताच्या अभिमानाची, गाथा गाऊ नेमाने ॥*
*सात कोटी दलितांचा, जो कलिजा प्रेमाचा*
*उच्चार ज्याच्या नावाचा, पवित्र आणि पुण्यकर ॥'*



पुनर्वसू यांनी भीमगाथा रचून मराठी साहित्याची शोभा वाढविली. मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या शोभा प्रकाशनने 14 एप्रिल 1963 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणगौरव विशेषांक प्रकाशित केला होता. त्यात ही भीमगाथा आजही वाचावयास मिळते.

*'सद्विद्येचा महापुरुष, उत्तम लक्षणी हा विशेष*
*गाथा गाण्या परम संतोष, आम्हा लागी होतसे ॥*
*परम ज्ञाता बुद्धभक्त, महापंडित आणि विरक्त*
*याने केले दलिता मुक्त, स्मृति कारागृहांतून ॥'*

पुनर्वसू यांच्या प्रभावी लेखणीतून उतरलेल्या या भीमगाथाचे 14 एप्रिल डॉ. आंबेडकर जयंती, 6 डिसेंबर महापरिनिर्वाण दिन या दिवशी हमखासपणे घरोघरी वाचली जायची, असे जुने जाणकार आजही मोठ्या अभिमानाने सांगतात.

*'याने सकल जनतेला, माणुसकीचा मार्ग दाखविला ।*
*खरोखर हा तिलक झाला, मानवतेच्या माथ्याचा ॥*
*पवित्र जणू गंगाजळ, तैसे याचे जीवन निर्मळ*
*अभ्यासता येई बळ, कळिकाळाशी लढण्याचे ॥'*

अनिरुद्ध पुनर्वसू यांनी पत्रकारितेसोबतच 25 कथा, कादंबऱ्यांतून ललित लेखन केले. 'प्रीत पतंगाची खरी' या त्यांच्या कादंबरीवर चित्रपटसुद्धा प्रदर्शित झाला होता. दहा वर्षे 'गोमांतक' वृत्तपत्राचे संपादकपद भूषविताना त्यांनी सामाजिक चळवळीत स्वतःला वाहून घेतले होते. गोव्यात मराठी भाषेला कोकणी भाषेबरोबरच राज्यभाषेचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि गोवा मुक्ती संग्राम यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. गोव्यात अपंग मुलांसाठी 'लोकविश्वास प्रतिष्ठान' ही संस्था स्थापन केली होती. 'नवयुग'कार आचार्य अत्रे, 'पुढारीकार' डॉ. ग. गो. जाधव, 'समतानंद' अनंत हरि गद्रे आदि अनेक स्मृती पुरस्काराने अलंकृत नारायण आठवले (16 ऑगस्ट 1932 - 28 एप्रिल 2011) कायमच अनुयायांच्या स्मरणात आपल्या कर्तबगारीने आणि 'भीमगाथा'चा रूपाने सदैव जिवंत राहतील.

*'म्हणे भाग्य फळा आले, चौदावे हे रत्न जन्मले*
*शब्द तयाचे खरेच ठरले, कर्तृत्वाने भीमाच्या ॥*
*दुष्ट रूढींच्या पाठीवर, फटके ओढून भराभर*
*भीम ठरला खरोखर, रत्न जणू चौदावे ॥'* ■ ■



मिलिंद मानकर
मो. 8177866397

---

# देशातील वातावरण विषारी होत चालले
# सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी



भट उच्च गुलाम झाले. भटांना लाज वाटली नाही. त्यांनी पराकोटीचा निर्लज्जपणा केला. उलट धर्मांध होऊन प्रत्येक राजवटिशी तह केला. 'तुम्ही आमच्या देशावर सत्ता गाजवा. धर्मसत्तेत हात घालू नका.' परकियांना भारतावर राज्य करण्याची भट संधी उपलब्ध करून देत राहिले. केवढा हा स्वार्थ? देश, समाज व धर्माशी केवढी ही बेइमानी? देशावर मोगलांची, इंग्रजाची सत्ता आली. चुटकी वाजवल्यासारखे त्यांना पिटाळून लावता आले असते. पण धर्मसत्ताधारी भट बेशर्म होऊन मूग गिळून बसले. उलट त्यांनी इतरांना शस्त्र धरण्यास मज्जाव केला. भारताची संपत्ती नजरे समोर लुटली गेली. भटांचे पाप देशाला भोगावे लागतात. भारत देश 1000 वर्षे मुघलांचा व 200 वर्षे इंग्रजांचा गुलाम राहिला. हिंदू धर्माच्या अत्याचारातून मुक्त होण्यासाठी अनेक भारतीयांनी धर्म परिवर्तन केले. हिंदू भटांच्या गुलामीतून ते मुक्त झाले. देशात मशिदी, चर्च बनले. जहाल, मवाळ क्रांतीकारी संघटनांच्या स्वातंत्र्य संग्रामात अनेक राष्ट्रपुत्रांनी देशासाठी प्राण गमवावे. डॉ. भीमराव आंबेडकरांनी एकट्याने ब्रिटिशांच्या तसेच हिंदू धर्माच्या गुलामीतून मुक्तिसाठी विद्वत्तेच्या बळावर एकाच वेळेस अनेक आघाड्यातून संघर्ष सुरू केला. गोलमेज परिषदा, ब्रिटिश कमिशनापुढे साक्ष, निवेदनाने आपली बाजू मांडली व जिंकली. 1947 च्या स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने संविधानमुळे ब्रिटिशांच्या व हिंदूधर्माच्या गुलामीतून देशाला मुक्ती मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्वात मोठे भारताचे समतावादी, लोककल्याणकारी लोकशाही तत्वाचे संविधान निर्माण केले. 1950 ला खऱ्या अर्थाने संविधान लागू झाले. त्यापूर्वीचे सर्व ब्रिटिश कायदे रद्द झाले. पण 1949 चा महाबोधी विहार व्यवस्थापनाचे बीटीए कायदाचे हक्क स्वार्थांध भट अजूनही सोडायला तयार नाही. संविधानाने जाती, धर्म, स्त्रिया, बहुजनावर हजारो वर्षांपूर्वीपासून होत असलेली गुलामी संपविली. पण अधोरी आणि विकृत वृत्तीचे मनुवादी ब्राम्हण संविधान मानायला तयार नाही. हा राष्ट्रद्रोह सरकारला दिसत नाही की मुद्दाम हे घडवले जाते? भारतीयांना इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळाले. पण हिंदू धर्मातून मुक्ती मिळाली नाही. सहज संविधान मानेल तो गुलामी पाळणारा धर्म व त्यास चालवणारे ब्राह्मण गप्प कसे राहतील? ब्राम्हण वकील अनिल मिश्राच्या ब्राम्हणी बिरादरीने षडयंत्र रचला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान लिहिला नसल्याचा खोटा पुरावा तयार केला. त्याचा गाजावाजा केला. सर्व अधिकारी स्तराच्या मंजुरी नुसार सविधानकार डॉ. बाबासाहेबांची पूर्ण प्रतिमा तयार झाली. प्रतिमा आणली गेली. ग्वाल्हेर उच्च न्यायालयाच्या प्रांगणात ओटा तयार झाला. पण अनील मिश्रा नावाच्या ब्राम्हण वकिलांने संविधानाचा व डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचा विरोध केला. प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालयाचा ब्राम्हण वकील राकेश किशोरने सरन्यायाधीस भूषण गवईवर सर्वोच्च न्यायालयात दि. 6 ऑक्टोबर 2025 ला जोडा (बूट) फेकला. ब्राम्हण संघटनांनी या प्रवृत्तींचा विरोध केला नाही. ते ईडी, रासुकापासून मुक्त राहीले. ते पूर्व नियोजित कट असावे असे वाटायला लागले. बहुसंख्यकांचा समाचार घ्यायला लागलेल्या 4टक्के ब्राम्हणाचा समाचार घेण्यास सुरुवात होण्यात गैर काय? अशी भणक व्हायला लागली. भ्रष्टाचारात अनेक नेते, पुढारी अडकवले ते बाईज्जत सुटले. सरकार आपली, आपण निवडून दिलेली आहे. देशाची अस्मितेसाठी शासन जबाबदार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीमुक्त व विषमतामुक्त समाजासाठी 1935 ला येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली. 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन सात लक्ष अनुयायांना 21 वर्षांनंतर बौद्ध धम्माची दीक्षा दिली. हिंदू धर्माच्या गुलामीतून समाज मुक्त केला. शुद्र, अतीशुद्र, महिला जवळपास लोकसंख्येच्या 15टक्के समाजाला हिंदू धर्माच्या गुलामीतून मुक्तीची संधी मिळाली. स्वातंत्र्यानंतर कंगाल देशात भारतीय सरकारने मजूर-बहुल, शेती-प्रधान देश असल्याची जाणीव ठेवून विज्ञान, तंत्रज्ञान, कारखाने, सुरक्षा साधने, नव निर्मिती प्रकल्पे, बंधारे, वीज, अशा अनेक क्षेत्रात पंचवार्षिक योजनेत भौतिक विकासाने देश स्वयं निर्भर होण्याच्या मार्गावर आणला. भटांना हे खटकले. त्यांच्या भुवया चढल्या. त्यांनी धर्म पुढे करून स्वतंत्र भारताची सत्ता हस्तगत केली. 1947 नंतर देशात नवनिर्मितीचे विविध नवे प्रकल्प निर्माण झाले. पण धर्मसत्तेला हे पटेनासे झाल्याने स्वतंत्र भारताची सत्ता काबीज करताच त्यांचा बदला सुरु झाला. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी खस्ता खाल्ल्या नाही, ज्यांना स्वातंत्र्याची गरज नव्हती त्यांना त्याचे मोल नाही हे सिद्ध व्हायला लागले. देशातील सर्व सरकारी कारखाने, प्रकल्प सरकारने कवडीमोल विकले. काही प्रकल्पातून सरकारी शेअर काढले. देशात नव निर्मिती नवे प्रकल्प दिवास्वप्न झाले.

क्रमशः ■ ■

**विद्या व्यासंग**



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064

---

# मासिक पाळीच्या समस्या आणि त्यावर उपाय

मुलगी वयात आल्याचे मुख्य लक्षण म्हणजे मुलीची मासिक पाळी सुरू होणे. मुलीला पहिली मासिक पाळी येते त्या अवस्थेला Menarchea असे म्हणतात. मासिक पाळी यायच्या अगोदर मुलीच्या शरीरात शारीरिक भावनिक व मानसिक बदल दिसून येतात. साधारणतः वयाच्या 9 ते 13 या वयाच्या कालावधीमध्ये हे बदल दिसून येतात. यालाच आपण पौगंडावस्था किंवा puberty स्टेज असे म्हणतो. साधारणतः मुलीला पाळी येण्याच्या एक-दोन वर्षाअगोदर आणि मासिकपाळी आल्यानंतर खालीलप्रमाणे शारीरिक बदल दिसून येतात. यामध्ये स्तनांची वाढ होणे, काखेत आणि जननेंद्रियाच्या ठिकाणी केस येणे (axillary and pubic hair growth), उंची वाढणे, शरीराला गोलाकार आकार प्राप्त होणे. तसेच कंबर व नितंब रुंद होतात. त्यानंतर चेहऱ्यावर पिंपल्स म्हणजेच मुरूम येतात, जास्त घाम येऊ लागतो. तसेच या वयामध्ये मुली सुंदर दिसू लागतात.

**मानसिक व भावनिक बदल :** यामध्ये mood swings म्हणजे कधी खूप एकटह्य वाटणे, क्षणात राग येणे, लगेच आनंदी होणे, खूप रडावेसे वाटणे, चिडचिड होणे यासारखी लक्षणे दिसू लागतात. आपण आता मोठे झालो आहे याची तीव्र जाणीव होणे, आरशासमोर स्वतःला न्याहाळत राहणे, आरशासमोर जास्त वेळ घालवणे, आपण सुंदर दिसतो आहे ही भावना वाढीस लागणे. समवयस्क मित्र-मैत्रिणींचा सहवास आवडू लागतो, विरुद्ध लिंगी आकर्षण (opposite sex attraction) वाढायला लागते. हे सर्व बदल शरीरात तयार होत असणाऱ्या हार्मोन्समुळे होऊ लागतात. यामध्ये स्त्रीच्या शरीरात इस्ट्रोजन आणि प्रोजेस्ट्रॉन हे हार्मोन स्त्रीचे स्त्रीत्व जपण्यास मदत करते. तसेच मासिक पाळी नियंत्रण करण्यासाठी सुद्धा महत्त्वाचे असते. साधारणतः मुलीमध्ये मासिक पाळीची सुरुवात वयाच्या 11 ते 13 या वयामध्ये होते. अशावेळी प्रत्येक पालकांचे प्रामुख्याने आईचे कर्तव्य आहे की तिने आपल्या पौगंडा अवस्थेमधील असलेल्या मुलीला मासिक पाळीबद्दल शास्त्रोक्त माहिती देऊन तिला याबद्दल असलेल्या शंका किंवा भीती यांचे समाधान करणे महत्त्वाचे असते. नाहीतर पुढे जाऊन मुलीला मासिक पाळी बद्दल भीती किंवा घृणा निर्माण होऊ शकते. गरज पडल्यास स्त्रीरोग तज्ञाचा सल्ला घ्यावा. आपल्या समाजामध्ये मासिक पाळी बद्दल खूप सारे गैरसमज आहेत. जसे की पाळी आल्यावर मुलीला वेगळे ठेवणे, तिला स्वयंपाक घरात येण्यास बंदी घालणे, कुठल्याही धार्मिक कार्यात सहभागी न होऊ देणे. यामुळे त्या मुलीमध्ये आपल्यासोबत काहीतरी चुकीचे होत आहे ही भावना वाढीस लागू शकते. म्हणून हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. 'मासिक पाळी सुरू होणे म्हणजे एका कळीचे फुलात रूपांतर होणे होय'. म्हणजेच एका मुलीचे रूपांतर स्त्रीमध्ये होण्याची पहिली पायरी होय. म्हणून कळी उमलताना तिची काळजी घेणे गरजेचे आहे. आपल्या समाजामध्ये काही ठिकाणी मुलीची पहिली पाळी येणे हा एक कौटुंबिक उत्सव म्हणून साजरा केल्या जातो. प्रत्येक आईने आपल्या मुलीला मासिक पाळीमध्ये घ्यावयाची काळजी तसेच सॅनिटरी पॅड कसे वापरावे याबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. आजकाल तर सोशल मीडिया किंवा युट्युबवर याबद्दल खूप छान शास्त्रीय माहिती दिलेली आहे. गरज पडल्यास यावर पुस्तके सुद्धा उपलब्ध आहेत. याचा जरूर उपयोग करावा. मासिक पाळी येणे ही एक नैसर्गिक क्रिया आहे. मुलीला मासिक पाळी येणे याचाच अर्थ असा होतो की ही मुलगी पुढे जाऊन प्रजनन म्हणजे संतती प्राप्त करण्यासाठी सक्षम आहे. साधारणतः मासिक पाळीमध्ये रक्तस्त्राव हा 3 ते 5 दिवस असतो. यामध्ये जवळपास 50 ते 80 मिली. ब्लड लॉस होतो. म्हणजे दिवसातून तीन ते चार सॅनिटरी पॅड use होते. मासिक पाळीचा कालावधी हा 28 ते 30 दिवसांचा असतो. तसेच काही मुलींमध्ये हा कालावधी 45 दिवसाचा पण राहू शकतो. मासिक पाळी एक-दोन दिवस मागे पुढे येऊ शकते. सुरुवातीच्या काही महिन्यांमध्ये मुलीची पाळी अनियमित असू शकते. कारण या काळात शरीरामध्ये हार्मोनल बॅलन्स व्हायला वेळ लागतो. त्यानंतर मात्र मासिक पाळी नियमित होते.



**'मासिक पाळीच्या समस्या' :** 1) Dysmenorhea ( painfull menses) यामध्ये पाळीच्या वेळी ओटी पोटामध्ये वेदना होतात तसेच कंबर दुखी, पाठ दुखी, उलटी मळमळ, डोकेदुखी यासारखा त्रास होतो. पाळीच्या वेळी जर असह्य वेदना होत असतील तर लगेचच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषध घ्यावे. खूप जास्ती त्रास होत असल्यास स्त्री रोग तज्ञांचा सल्ला घ्यावा व त्यांच्या मार्गदर्शनानुसार तपासण्या करून घ्याव्या. याकडे दुर्लक्ष करू नये. कारण बरेचदा या त्रासाकडे, हा त्रास सर्वांनाच होतो म्हणून दुर्लक्ष केल्या जाते. आजूबाजूच्या स्त्रियांचे, नातेवाईकांचे अनुभव आम्हीही हा त्रास सहन केला, मुलगी म्हणून आता तुलाही सहन करावा लागेल असाच दृष्टिकोन समाजामध्ये दिसुन येतो.

2) Menorrhegia (अतिरक्तस्राव) heavy bleeding : साधारणतः मासिक पाळीच्या तीन ते पाच दिवसात 50 ते 80 मिली. ब्लड लॉस होत असतो. म्हणजे दिवसातून तीन ते चार सॅनिटरी पॅड्स तिला लागू शकतात. परंतु ज्यावेळी प्रत्येक दोन तासांनी किंवा वारंवार सॅनिटरी pad बदलावे लागत असेल तर याचा अर्थ तिला अतिरक्तस्राव होत आहे, असे समजावे आणि यासाठी लगेचच स्त्रीरोग तज्ञचा सल्ला घेऊन आवश्यक औषधी उपचार करावा. गर्भाशयामध्ये गाठी असणे तसेच ovary मध्ये गाठ (ovarian Cyst), fibroid uterus या कारणामुळे मासिक पाळीच्या वेळी अतिरक्तस्राव होऊ शकतो. याकडे दुर्लक्ष केल्यास शरीरात रक्ताची कमी होऊन severॲनिमिया होऊन चक्कर येणे, अशक्तपणा येऊ शकतो.

3) Oligomenorrhoea (अल्प रक्तस्राव) scanty menses : यामध्ये मासिक पाळीच्या दरम्यान फक्त एक ते दोन दिवस रक्तस्राव होतो व तोही खूप कमी प्रमाणात. याचे प्रमुख कारण म्हणजे मुलीच्या शरीरात हिमोग्लोबिनची कमी असणे, तसेच हार्मोनल इम्बॅलन्स यामुळे ही स्थिती उद्भवू शकते. यासाठी स्त्री रोग तज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

4) Irregular menses : यामध्ये मुलीच्या पाळीची तारीख निश्चित नसते ती कधी खूप लवकर येते तर कधी खूप उशिरा येते. याचे कारण हार्मोनल ईमबॅलन्स हे आहे. तसेच pcod, थायरॉईड, डायबिटीस किंवा लठ्ठपणा यामुळे सुद्धा पाळी अनियमित होऊ शकते. अशावेळी स्त्री रोग तज्ञांच्या सल्ल्यानुसार योग्य उपचार करणे गरजेचे आहे.

5) premenstrual tension : मासिक पाळी सुरू होण्याच्या एक-दोन दिवस अगोदर स्तनामध्ये वेदना होणे, स्तन भारी भारी वाटणे, डोकेदुखी, पोटात दुखणे, उलटी मळमळ यासारखे लक्षणे दिसतात आणि पाळी आल्यानंतर एक दोन दिवसात आपोआप ही लक्षणे कमी होतात. अश्यावेळी गरज पडल्यास डॉक्टरच्या सल्याने औषधी उपचार घ्यावे.

6) Ammenorrhoa (मासिक पाळी न येणे) : यामध्ये 1)प्रायमरी अमिनोरीया 2)सेकंडरी अमिनोरीया असे दोन प्रकार आहेत. 'प्रायमरी अमिनोरीया' म्हणजे मुलीच्या वयाच्या सोळा वर्षानंतर सुद्धा मासिक पाळी सुरू न होणे. याचे मुख्य कारण म्हणजे मुलीची व्यवस्थित वाढ न होणे, हार्मोन्सची कमी, गर्भाशयासंबंधी आजार असणे, गर्भाशय नसणे किंवा प्रजनन संस्थेतील कुठल्याही प्रकारची कमी यामुळे ही स्थिती उद्भवू शकते. यासाठी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेऊन मुलीची संपूर्ण तपासणी करणे आवश्यक आहे.

Secondary Ammenorrhoa : यामध्ये मासिक पाळी सुरू होते. परंतु नंतर रक्ताची कमी, काही हार्मोनल disorders, pcod, diabetes, अती लठ्ठपणा यासारख्या आजारामुळे मासिक पाळी येत नाही. अश्यावेळी या आजारावर योग्य उपचार केल्यास ही समस्या दूर होऊ शकते. 'लग्नानंतर मासिक पाळी एक दोन महिने न येणे, थांबणे हे गर्भधारणेच प्रमुख लक्षण आहे आणि ही कुटुंबासाठी व परिवारासाठी आनंदाची बातमी असते. परंतु आपल्या समाजामध्ये हेच जर अविवाहित स्त्री किंवा मुलीमध्ये अचानक पाळी थांबली असेल तर मुख्य कारण गर्भधारण हे असू शकते आणि हिच गर्भधारणा तिच्यासाठी, कुटुंबासाठी व परिवारासाठी काळजी व चिंतेची बाब असते'. अश्यावेळी स्त्रीरोगतज्ञांचा सल्ला घेऊन योग्य निर्णय घ्यावा. आई-वडिलांचे कर्तव्य आहे की आपल्या मुलीवर बालपणापासूनच धम्म संस्कार करावे. तसेच घरी सर्वांनी बुद्ध धम्मानुसार आचरण करावे. मुलगी वयात आल्यानंतर आईचे कर्तव्य आहे की आपल्या मुलीला समाजामध्ये वावरताना योग्य काय, अयोग्य काय तसेच शीलाचे काय महत्त्व आहे हे समजून सांगावे. तसेच प्रत्येक मुलीला रोजच्या जीवनात धम्माच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करण हे प्रत्येक पालकांचे कर्तव्य आहे. 'स्वस्त रहा मस्त रहा'. ■ ■

**आरोग्यम् सुखसंपदा**



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

“ अडचणींचा सामना करणे हे यशाचे प्रवेशद्वार आहे... ”



# राष्ट्रपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापुरुष, महामानव, दलितांचे कैवारी, घटनेचे शिल्पकार, थोर समाज सुधारक, हे सर्व पैलू त्यांच्या मानवतेवरील असीम प्रेमाचे, भक्तीचे प्रतीक आहेत.**

परंतु याचबरोबर तेवढाच महत्वाचा पैलू म्हणजे ते एक खरे राष्ट्रभक्त व राष्ट्रपुरूष होते. हा देश बलवान, एकात्म व एकसंघ होऊन या देशात समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधूभाव व शांतता सहभाव कसा नांदेल हेच त्यांच एकमेव स्वप्न होते. त्यासाठीच त्यांचा जीवन संघर्ष होता. त्यांच्या जीवन संघर्षाला मानवतेची व राष्ट्रप्रेमाची फार मजबूत बैठक होती. त्यांच्या जीवन स्वप्नांशी निगडीत होता व म्हणून या स्वप्न संकल्पनाचा व संकल्पपूर्तीच्या आड येणाऱ्या, विरोध करणाऱ्या सर्व विषमता भेद धार्मिक, सामाजिक, रूढी परंपरा, व शोषणाच्या सर्वच प्रस्थापित व प्रचलित मूल्यावर त्यांनी कडाडून हल्ला केला, ज्या ज्या गोष्टी व्यक्ती समाज व राष्ट्राला दुर्बल, कमजोर अगतिक बनविणाऱ्या आहेत त्या सर्वच गोष्टीविरूद्ध त्यांनी महायुद्ध पुकारले, हा देश बलवान एकसंघ राहायचा असेल तिथे शांती, समता, बंधुभाव न्यायाचे अविरत सुराज्य नांदायचे असेल तर इथल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीला (मग तो कितीही उपेक्षित असो) त्याला विकासाची संधी देऊन त्याची सन्मानाची यथोचित हमी देऊन त्याचे अंगभूत सुक्त गुणांचा हातभार सहभागीय राष्ट्रालाच नव्हे तर सृष्टीलाही समृद्धमय सौंदर्यमय आनंदमय करण्यात प्रत्येकच व्यक्तीचा ऊर्जेचा, बुद्धीचा, श्रमाचा, प्रेमाचा, त्यागाचा सारखाच उपयोग व्हावा त्याला तशी सन्मानपूर्वक संधी मिळावी व या पृथ्वीवर शांती, समता, करूणेचे राज्य राहावे. यासाठी व केवळ यासाठी डॉ. बाबासाहेबांचा श्वासनिश्वास संघर्षरत कार्यरत होता. या देशातील समाजवास्तव्य जर लक्षात घेतले तर त्यावेळी नि आजही तेवढेच विचित्र व विदारक आहे, भीषण आहे. इथल्या प्रत्येक माणसाच्या मना, मेंदूवर चातुवर्ण, जातीयता, धर्मांधता, जन्माधिष्टीत श्रेष्ठ-कनिष्ठची भावना सरंजामी गुलामी मानसिकता आजही तेवढीच हावी आहे. माणसाला पंगू अगतिक बनवणाऱ्या देवदैव, पुनर्जन्म याही गोष्टी समाज माणसात तशाच शाबूत आहे. या साऱ्या गोष्टींचा प्रचंड पगडा एका न उतरणाऱ्या नशेसारखा भिनला आहे. मानवी व राष्ट्रीय भावनेपेक्षा आज तरी या भावना फार बलवान आहे. राष्ट्रापेक्षा धर्म व धर्म पेक्षा जात आणि जातीमुळे मिळालेले जन्मजात अहंगंड या साऱ्याच उन्मादात राष्ट्र सापडले आहेत. भारत देश हा एक धार्मिक देश असला तरी इथे सांप्रदायिकतेने धर्मांधता नासवली आहे. त्यामुळे धार्मिक क्षेत्राला युद्धाच्या छावणीचे स्वरूप आले आहे. आजहि सारे संत, महंत, मुल्ला, पंडित हे शांती, बंधुभाव, करूणा, मैत्रीची मानवतेची भाषा विसरून (जी कधीच नव्हती) द्वेष हिंसा वाढवणारे आखाडे बनवीत आहेत. देशभक्ती व देशभक्तीच्या नावाखाली धार्मिक सांप्रदायिक अहंकाराला जागून, चेतवून मानव युगाला पाषाण युगकडे नेत आहे, धर्माच्या नावाखाली साऱ्या शैतानी प्रवृत्ती मस्त आणि पोक्त झाल्या आहेत. आधुनिक ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाने निकामी व कुचकामी झालेल्या धर्मपंडितांना, धर्म प्रमुखांना पाखंडी भोन्दुंना आपले आसन स्थिर ठेवायचे असल्यामुळे साऱ्याच अनुयायांना चेतविण्याची भडकवण्याची भाषा सुरू केली आहे. सामाजिक क्षेत्रात यापेक्षा वेगळे वातावरण नाही, हा देश अनेक जाती, पोट जाती आणि असमानतेच्या प्रचंड दऱ्यामध्ये विभागलेला आहे. जातीयतेने ज्यांना जन्मजात सुख सोयी मानसन्मान शिक्षण सुबत्ता मिळाल्या आहेत, मिळत आहेत, त्या तशाच कायम राहीले पाहिजेत आणि केवळ जन्मामुळे ज्यांना दुःख, दैन्य, दारिद्र्य, वंचितपणा, निरक्षरता मिळाल्या आहेत व ते आजतागायत भोगत आहेत. यांना त्यापासून मुक्ती हवी आहे, त्यामुळे हा वंचित समाज जागे होऊन रस्त्यावर येत आहे, संघर्ष होत आहे, यासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी आहे आणि या संघर्षरथ समूहांना कसे दडपता येईल याचेही डावपेच व तयारी सुरू आहे. दोन्ही बाजूच्या समंजस नेतृत्वासाठी हा कसोटीचा काळ आहे. जागृत मन स्वस्थ बसणार नाहीत, परंपरागत मन समृद्धी जाईल. त्यामुळे वरिष्ठ वर्ग ही स्वस्थ बसणार नाही. प्रश आहे समाज राष्ट्र सुख शांतीने राहील किंवा नाही. यामध्ये राष्ट्र आणि समाज एक संघतेला राष्ट्रीयत्वाला प्राधान्य देऊन प्रगल्भ जाणिवेचे समंजस, संयमशील, समतोल नेतृत्वाची गरज त्यांची कार्य करण्याची पद्धत या साऱ्याच गोष्टी महत्वाच्या आहेत. राजकरण तर डोंबाऱ्याचा खेळासारखा झाला आहे, राजकारणात काम करणाऱ्यांना किंवा सत्तेमध्ये असणाऱ्यांना सत्ता या सत्तेमुळे मिळणाऱ्या साऱ्या भौतिक सोयी सवलती, अधिकार, मान सन्माान या गोष्टी पलीकडे काहीच दिसत नाही. समाजात काही मूलभूत परिवर्तन करावयाचे आहे, त्यांचे भान त्यांना नसतेच आपली सत्ता राहील कशी, नसेल तर ती मिळेल कशी या गणितापलीकडे त्यांच्या हिशोब नसतो, त्यामुळे ते समाजातील कुठल्याही घातक-विघातक प्रवृत्तींना राजकीय लाभाशिवाय हात लावण्याचे धाडस करीत नाहीत, त्यामुळे जिथे शासनच मायबाप सरकार गप्प आहे इथे विघातक शोषक प्रवृत्ती आटोक्यात आणणे कोणत्याही सत्ताधारी असो विरोध असो ते जमत असूनही करणार नाही. त्यामुळे राजकीय क्षेत्रापासून फारसे पदरी लागण्यासारखे काही नाही, कारण आज जो जेलमध्ये आहे तो उद्या मुक्त होतो, आमदार मंत्री होतो. त्यामुळे राजकारण म्हणजे बाहेरून कीर्तन आतून तमाशा आहे. (लोकांनाही तो हवा असतो सोयीनुसार). सांस्कृतिक वैचारिक क्षेत्राच्या विचार केला तर काही कवी, लेखक, विचारवंत, कलावंत व पत्रकार यांना सामाजिक भान आहे. ही मंडळी थोडी संवेदनशिल आणि विचारांची बैठक मजबूत असल्यामुळे यांच्याकडून काही अपेक्षा धरणे चुकीचे ठरणार नाही. यांच्यावरही सत्ता-संपत्ती भौतिकता झगमगाट मानसन्मान यांची भुरळ पडते नाही असे नाही, तरी त्याच माणसाचे नाते सहज सुटत नाही. त्यांच्या चिंतनाचा मुख्य केंद्रबिंदू हा सर्वसामान्य माणूसच आहे आणि तो असावा हीच अपेक्षा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना सादर करतेवेळी येथील राजकर्त्यांना व या देशातील जनतेला एक इशारा दिला होता. डॉ. आंबेडकर म्हणतात, आज आपण एका विषम समाजव्यवस्थेतून जात आहोत. आपल्याला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. परंतु सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्यापासून आपण फार दूर आहोत. इथल्या राजकर्त्यांनीच नव्हे तर विचारवंतांनीही इथे सामाजिक, आर्थिक समानता आणण्यासाठी प्राणपणाने घटले पाहिजे. नाहीतर जे लोक इथे सामाजिक, आर्थिक विषमतेने पीडित आहेत त्यांना योग्य न्याय आपण देऊ शकलो नाही तर ते लोक राजकीय लोकशाहीचा डोलारा जास्त दिवस टिकू देणार नाही. डॉ. बाबासाहेब पुढे असेही म्हणतात, हा देश बलवान एकात्म एकसंघ राहावा हे माझे स्वप्न आहेत. 'मी देशापेक्षा कोणालाही मोठा मानत नाही, समजत नाही. माझ्यासाठी देश मोठा. राष्ट्राच्या हितासमोर मी माझे माझ्या समाजाचेही हित दुय्यम समजतो' या राष्ट्राच्या संस्कृतीला बाधा पोहोचेल असे कोणतेही कृत्य माझ्या हातून होणार नाही.



धर्मांतराच्या संदर्भातही डॉ. बाबासाहेब म्हणतात, बौद्ध धर्म याच मातीतला आणि जगाला तारणारा आहे. म्हणून मी बुद्धाचा धम्माचा स्वीकार करतो. हालअपेष्टा अपमान उपेक्षितपणा सहन करूनही डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''देशाचे वाटोळे करायला मला काहीही अवधी लागणार नाही. परंतु माझे नाव या देशाच्या इतिहासात विध्वसंक म्हणून राहू नये इतर कोणत्याही राष्ट्रभक्तापेक्षा या देशावर माझे तसूभर ही प्रेम कमी नाही.'' डॉ. बाबासाहेब पुढे असेही म्हणतात ''राष्ट्राच्या कल्याणासाठी, समृद्धीसाठी, स्वातंत्र्यासाठी, रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत लढले पाहिजे.'' अशाप्रकारे या राष्ट्राला एकात्म बलवान एकसंघ ठेवून येथे बंधुभाव, प्रेम, करूणा, शांती नांदावी. यासाठी डॉ. आंबेडकर यांनी आयुष्यभर संघर्ष केला, आपण आपल्यातील जातीयता, धर्मांधता, विषमता, जातीय अहंभाव, सत्ता, लालसा, सत्ता मग्नता, दांभिकता, वैरभाव या गोष्टी विसरून समता, बंधुता, करूणा, मित्रता वाढवली, जोपासली पाहिजे. नाहीतर हे राष्ट्र एका ज्वालामुखीवर उभा आहे. याचे उत्तर धर्मांधता, जातीयता, सत्ता, लालसा, भष्टाचार, लाचखोरी या गोष्टींना मूठमाती देऊन समानता, प्रामाणिकपणा, मैत्रीभाव, मानवता यांच्यात अंगीकार करून निरलस सेवेसाठी सत्ता, सामाजिक, आर्थिक परिवर्तनासाठी याच्या आंबेडकरांनीच घटनेत सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अंगीकारच नव्हे अंमल करावा लागेल. डॉ. आंबेडकर जयंती निमित्य आपण सर्वच देशवासियांनी या गोष्टीचा मनापासून विचार करावा. शेवटी डॉ. बाबासाहेबांचा एक संदेश देऊन निवेदन संपवतो. 'काही लोक म्हणतात, आम्ही भारतीय आहोत. परंतु मला ते पुरेसे वाटत नाही ते आपल्याला जात, प्रांत, भाषा, धर्म याला घट्ट कवटाळून असतात. त्यामुळे तुलनेत या निष्ठेमुळे आपली भारतीय म्हणून असलेली निष्ठा धोक्यात येता कामा नये. लोकांनी भारतीय आणि फक्त भारतीयच असावे.' आजच्या अराजकतेच्या उंबरठ्यावर हे विचार दीपस्तंभासारखे आहेत. ■ ■

सुधाकर लोखंडे
मो. 9970023788

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

## सत्यवादी

समाजात वेगवेगळ्या विचारांची माणसे असतात. ज्यांचे विचार एकमेकांशी जुळतात ते लोक जवळ येतात. काही मंडळी ही चांगल्या प्रवृत्तीची तर काही वाईट प्रवृत्तीची असतात. चांगली माणसे म्हणतात, मला कुणाला रंग लावायची गरज नाही. कारण माझ्या सत्य आणि वास्तववादी गोष्टींनीच समोरचे लालपिवळे होतात. खरी माणसे ही आपल्या विचारांवर ठाम असतात. त्यांची धारणा अशी असते की, प्रतिज्ञा अशी करावी की जा कोणत्याही कारणाने प्रभावित होणार नाही. त्यापासून कुणी परावृत्त करू शकणार नाही. तसेच प्रतिष्ठा अशी असावी की, कुणी अपमानित करू शकणार नाही. सत्यवादी मंडळी आपल्या भूमिकेवर ठाम असतात. ' माना कि बेहतरीन नहीं है हम, लेकिन साहब! बात-बात पर रंग बदले, इतने भी रंगीन नहीं हैं हम' असे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. चांगल्या व्यक्तींची किंमत ज्यांना कळत नाही त्यांना फक्त पश्चाताप मिळतो. चांगल्या व्यक्तींचा सहवास मिळत नाही. चांगल्या व्यक्तींचे मत बघीतले तर असे आढळून येते की, 'जिसका जैसा चरित्र होता है, उसका वैसा ही मित्र होता हैं, शुद्धता होती है विचारों में, आदमी कब पवित्र होता है? फुलों में भी कीड़े पाए जाते हैं, कोयले में भी हीरे पाए जाते हैं, बुराई को छोड़कर अच्छाई को देखो तो सही, नर में भी नारायण पाये जाते हैं, मैं आप लोगों के साथ हूँ, मेरा भाग्य है, पर आप सभी लोग मेरे साथ हैं, यह मेरा सौभाग्य है.' ■ ■

# ओबीसी व त्यांची जातीय पोट वर्गीकरणाबद्दलची भुमिका!

प्रश्न : सर, आपण रोहिणी आयोगाचे स्वागत केले म्हणजे ओबीसी कॅटेगरीला विभाजित करण्याला व त्यांच्या अ, ब, क, ड वर्गीकरणाला विरोध केलेला नाही. कोणत्याही अटी शर्ती वा किन्तु, परंतूच्या अडचणी न दाखवता रोहीणी आयोगाची त्वरीत अंमलबजावणी झाली पाहिजे, असेही आपण शासनास निक्षून सांगीतले आहे. काय नेमकी आपली भुमिका आहे, कृपया आपल्या वाचकांसाठी विस्ताराने सांगावे.

उत्तर : विवेकजी, जातीव्यवस्थेचे एक अनन्य वैशिष्ट्य असे आहे की, जेव्हा जेव्हा आपल्यापेक्षा खालच्या पायरीवर उभ्या असलेल्या जातीला काही अधिकार देण्याचा, हिस्सा देण्याचा विषय येतो, तेव्हा तेव्हा किंतू, परंतूची भाषा वापरून हिस्सा देण्यास टाळाटाळ केली जाते. यादव, कुणबी, माळी या मोठ्या ओबीसी जातीतील काही नेते 'जातनिहाय जनगणनेनंतरच राहीणी आयोग लागू करणेस सांगत आहेत.' परंतू हे नेते 30 वर्षांपूर्वीचा इतिहास सोयिस्करपणे विसरले आहेत. काय आहे हा इतिहास, जरा आठवा! फार जुना नाही, ताजाच आहे, आठवा तो इतिहास! 45 वर्षांपूवी ओबीसींच्या आरक्षणाबद्दल व एकूणच आरक्षणाबाबत काय म्हणत होते ब्राह्मण-मराठा जातीचे नेते? 1981-82 साली ''मंडल आयोग हा बंडल आयोग आहे, खबरदार जर ओबीसी जातींना आरक्षण दिले तर उभा महाराष्ट्र पेटवून टाकीन'' अशी कोल्हेकुई करणारा मुच्छड-पाटील ब्राह्मणांचा हस्तक असलेला मराठाच होता! 'कालेलकर आयोग व मंडल आयोग लागू केला तर समाजात फुट पडेल, जातीयवाद वाढेल', असे किंतू, परंतूचे मुद्दे उपस्थित करून सत्ताधारी ब्राह्मण-मराठा जातींनी 35 वर्षे ओबीसी जातींना आरक्षण नाकारले. याच पद्धतीने कुणबी, माळी, यादव, कुर्मी या मोठ्या ओबीसी जाती किंतू, परंतूची भाषा वापरून रोहीणी आयोगाच्या ओबीसी-वर्गीकरणाला नाकारत असतील तर या मोठ्या ओबीसी जाती व ब्राह्मण-मराठा जाती यांच्यात फरक काय? आपल्यापेक्षा खालच्या पायरीवर




उभ्या असलेल्या जातीला रास्त हक्क नाकारणे म्हणजे ब्राह्मणवादच!

प्रश्न : रोहिणी आयोगाचे म्हणजे 'वर्गीकरणाचे' मूळ नेमके कशात आहे?

उत्तर : रोहिणी आयोगाचे म्हणजे जातीय पोट-वर्गीकरणाचे मूळ जातीच्या उतरंडीत आहे. कोणतीही एक जात दुसऱ्या जातीशी साम्य ठेवत नाही. त्यामुळे ओबीसी म्हणून सर्वच 2,633 जातींना एकाच पायरीवर ठेवून लाभ नाही मिळणार. मंडल आयोगाचे एक सदस्य माननीय एल. आर. नाईक यांनी हा मुद्दा मंडल अहवालात डिसेंट नोट म्हणून नोंद करून ठेवलेला आहे. याच मुद्द्याचा आधार घेत मी 1992 साली ओबीसींच्या वर्गीकरणाची मागणी केली होती. काय होती या मागणी मागची भुमिका? म्हणजे मंडल आयोग लागू होण्यापूर्वीच मी ओबीसी वर्गीकरणाची वैचारिक व व्यावहारिक मांडणी सरकारकडे केली होती. सुप्रिम कोर्टाने 16 नोव्हेंबर 1992 रोजी 27 टक्के ओबीसी आरक्षण वैध ठरविल्यानंतर संपूर्ण देशात म्हणजे केंद्र सरकार व राज्य सरकारांना आपापले जी. आर. काढून ते राबविणे भाग पडले.

प्रश्न : रोहिणी आयोगामुळे म्हणजे वर्गीकरणामुळे ओबीसी चळवळीत फूट पडेल, असे बरेच लोक सांगतात, त्याबद्दल...!

उत्तर : अजिबात नाही, उलट वर्गीकरणामुळे ओबीसी चळवळ मजबूतच होईल. मंडल आयोगाला विरोध करणारे काँग्रेस-संघ-भाजपा मायक्रो ओबीसी जातींसाठी रोहिणी आयोग आणतात, म्हणजे ते ओबीसीत फूट पाडण्यासाठी रोहिणी आयोग आणीत आहेत, असे काही लोक म्हणत असतील तर त्या लोकांना माझा एक सवाल आहे की, 'ओबीसीत फूट पाडण्याचा लाख प्रयत्न संघ-भाजपा करेल, पण फूट पडू द्यायची की नाही, हे आपण ओबीसींनी ठरवायचे आहे.' जर मोठ्या ओबीसी जातींनी राहिणी आयोगाला (पोट-वर्गीकरणाला) विरोध केला तर फूट पडणारच! वर्गीकरण करून ओबीसीं जातींमध्ये फूट पाडण्याचा संघ-भाजपाचा कुटील डाव हाणून पाडायचा असेल तर आपण मोठ्या दलित-ओबीसी जातींनी मनाचा मोठेपणा दाखवून वर्गीकरण स्वीकारलेच पाहिजे. मोठ्या ओबीसी जातींनी विरोध करण्याआधी स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की, ''राहिणी आयोगाच्या वर्गीकरणामुळे ओबीसी आरक्षणातील एक हिस्सा ब्राह्मण-मराठ्यांना मिळणार आहे काय? नाही ना! मग आपल्याच ओबीसी कॅटेगिरीतील छोट्या भावांना तो फायदा मिळणार आहे. मग त्यात वाईट वाटून का घ्यायचे? एकाच कुटुंबातील सर्व भावांना समान वाटा मिळत असेल तरच ते कुटूंब एकत्रित राहू शकते, अन्यथा कुटुंबाची शकले होतात. परंतू, आजपर्यंत एकाही ओबीसी नेत्याने व ओबीसी विचारवंताने रोहीनी आयोगाला विरोध केलेला नाही, याउलट ओबीसी वर्गीकरणाला पाठींबाच दिलेला आहे, याबद्दल मला ओबीसी जनतेचा रास्त अभिमान वाटतो!

प्रश्न : महाराष्ट्र सरकारला सादर केले निवेदनाचा आशय व त्यातील पोट-वर्गीकरणाचा तक्ता नेमका काय होता, त्याबद्दल सांगा...!

उत्तर : देशाच्या सुप्रिम कोर्टातील नऊ न्यायधिशांच्या पूर्ण-पीठाने मंडल आयोगाचा अहवाल वैध ठरविला व व्हि.पी. सिंग प्रणित जनता दल सरकारने 13 ऑगस्ट 1990 रोजी काढलेला ओबीसी जातीसाठी 27 टक्के आरक्षण देणारा सरकारी जी.आर. केन्द्र व राज्यसरकारांना लागू करण्यास भाग पाडले. सुप्रिम कोर्टाच्या मंडल जजमेंट प्रमाणे केन्द्र सरकारने व प्रत्येक राज्याने ओबीसी जातींसाठी 27टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करणे बंधनकारकच होते. 13 सप्टेंबर 1993 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय शरद पवार यांनी मंत्रालयातील 6 व्या मजल्यावरील सभागृहात निवडक ओबीसी नेते व ओबीसी अभ्यासकांची बैठक बोलावलेली होती. महाराष्ट्रात ही अंमलबजावणी कशी करायची याबद्दल विचारविनिमय करण्यासाठी ही व्यापक बैठक पवारसाहेबांच्या अध्यक्षतेखाली झाली. माननीय छगन भुजबळ, माननीय गोपीनाथ मुंडे हेही स्टेजवर उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या या बैठकीत मी लेखी व तोंडी निवेदन (संक्षिप्त भाषण) दिले. यात मी ओबीसी वर्गीकरणाचा तक्ता (ष्ट्द्धड्डह्ल्ह) जोडला होता. क्रिमी लेयरच्या आर्थिक वर्गीकरणाऐवजी जातीय पोट-वर्गीकरण करावे, अशी विनंती मी मुख्यमंत्र्यांना केली होती व तसा वर्गीकरण करणारा तक्ता (ष्ट्द्धड्डह्ल्ह) सादर केला होता. हे माझे निवेदन व जातीय पोट-वर्गीकरण करणारा तक्ता माझ्या 1993 साली प्रकाशित झालेल्या ''मंडल आयोग व आधुनिक पेशवाई'' या ग्रंथात पान नंबर 102 वर आहे. ■ ■

### ओबीसीनामा



प्रा. श्रावण देवरे
मो. 9422788546

# फडणवीसांनी महाराष्ट्र नासवला : श्याम मानव

**दिनांक 25 एप्रिल 2026 ला अमरावती येथील सांस्कृतिक भवनात अमरावती जिल्ह्यातील अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती तथा इतर समविचारी संघटनांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता.**




या कार्यक्रमाला खासदार बळवंत वानखडे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत लेखक प्रशिक्षक तथा संघटक प्रा. प्रेमकुमार बोके जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष शिवमती सीमा बोके आम्ही भारतीय जनसंस्कृतिक चळवळचे डॉ. प्रकाश मानेकर, संभाजी ब्रिगेडचे तुषार दादा देशमुख, गणेश गहूकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाच्या वतीने मी स्वतः या कार्यक्रमांमध्ये उपस्थित होतो. अगदी सुरुवातीला श्याम मानव यांनी आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरात प्रकरणात पोलिसांना छान कारवाई करू दिली याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. अशोक खरात यांच्यावर कारवाई झाली याचे कारण सांगत असताना मानव असे म्हणाले की, एकनाथ शिंदे त्यांचे 39 आमदार केसरकर यांनी सांगितल्याप्रमाणे यांनी सगळेच या बाबाचे भक्त होते आणि या बाबाच्या पाठीशी आपली सत्ता आणि संपत्ती उभी करत होते. रूपालीताई चाकणकर अजित दादाचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पाठीशी आता कोणीही उभे नाही आणि त्या अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्या आहेत आणि म्हणून अजित दादाच्या राष्ट्रवादीला आणि एकनाथराव शिंदे यांच्या खोट्या शिवसेनेला एक राजकीय संदेश देऊन अशोक खरातवर कारवाई करण्यात आली. परंतु जादूटोणाविरोधी कायद्यानुसार हे सगळे 39 मंत्री रूपालीताई चाकणकर ज्यांनी ज्यांनी प्रचार-प्रसार केला त्या संस्थेतले सर्व पदाधिकारी या सर्वांवर हा कायदा लागू होतो आणि या कायद्यानुसार सात वर्षाची शिक्षा आणि पन्नास हजार रुपयांचा दंड होऊ शकतो, इतका व्यापक हा कायदा आहे. श्याम मानव म्हणाले की, खरात प्रकरणात जर भारतीय जनता पक्षाचे मोठे दोन-तीन मंत्री सहभागी झाले असते, बाबाचे भक्त असते तर अशोक खरातवर कार्यवाही झाली असती का? याचे उत्तर नाही असे आहे असेही ते म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी दिशा सालीयन हीच्यावर बलात्कार करून तिचा खून केला असे खोटे एफिडेविट लिहून द्या, अनिल देशमुख यांनी नकार दिला आणि कुठलेही कारण नसताना या महाराष्ट्राच्या गृहमंत्र्याला 11 महिने जेलमध्ये डांबून ठेवण्यात आले. आपल्या राजकारणासाठी हा माणूस कोणत्या स्तराला जाऊ शकतो याची कल्पना महाराष्ट्राला आहे. अलीकडेच फडणवीस यांनी म्हटले होते महिला आरक्षणाच्या संदर्भात मी ओपन चॅलेंज देतो. आपण डिबेट करू पण त्यांनी एक खूटी मारली आणि ती म्हणजे माझ्या स्तरातला कुठलाही नेता असो त्यांच्याशीच मी चर्चा करीन आणि वर सांगितलेल्या प्रकरणावरून तुम्हाला त्यांचा स्तर कळला असेल. जादूटोणाविरोधी कायदा हा एक मताने संमत झालेला कायदा आहे. सगळ्याच पक्षाच्या लोकांनी त्याला संमती दिली आणि त्यासाठी श्याम मानव सरांनी त्यांना मानसिकरित्या तयार केले होते. नरेंद्र दाभोळकर सरांनी जो कायदा सबमिट केला होता त्या कायद्याला कोणीही मंजुरी द्यायला तयार नव्हते. दाभोळकर गेल्यानंतर मानवांनी हा कायदा हातात घेतला आणि त्याचा प्रारूप तयार केले आणि नंतर या कायद्याला विरोध करावा अशी स्थितीच निर्माण झाली नाही एवढा तो कायदा संतुलित बनलेला होता. छ. शिवाजी महाराजांनी आपली सगळे शस्त्र गर्भगळीत होऊन रामदासाच्या पायावर मस्तक ठेवले होते आणि मग रामदासाच्या प्रेरणेने त्यांनी स्वराज्य निर्माण केले असे वक्तव्य धीरेंद्र कृष्ण शास्त्री नावाच्या भोंदू बाबांनी केले. त्याचा समाचार घेत असताना नागपूरचा प्रकरण मानव सरांनी समजावून सांगितले आणि फडणवीस यांनी कुठल्याही प्रकारची कार्यवाही होऊ दिली नाही हे त्यातले वास्तव आहे. धिरेंद्र कृष्ण महाराज अर्धवट कार्यक्रम सोडून पळाला. नंतर त्याला स्वतःची दिव्यशक्ती सिद्ध करा, 30 लाख रुपये आव्हानात्मक बक्षीस तुम्हाला देता येईल आणि आम्ही आमचे काम सोडू देवू असे आव्हान दिले. परंतु ते त्यांनी काही स्वीकारले नाही. त्याच्यामुळे आव्हान न स्वीकारल्यामुळे हा बाबा बदमाश आहे, भोंदू आहे हे सिद्ध होईल आणि त्यांनी आव्हानातून पळ काढला. धिरेंद्र कृष्ण महाराज हा कुठली गोष्ट सिद्ध करू शकला नाही. एवढे सगळे होऊन सुद्धा त्याच्यावर कुठलाही एफआयआर दाखल करण्यात आला नाही. उलट त्याला भारतीय जनता पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात फिरवले आणि लोकांच्या अंधश्रद्धा वाढवल्या प्रदीप मिश्राचे कार्यक्रम सुद्धा भारतीय जनता पक्षाचे आणि देवेंद्र फडणवीस यांचे वतीने मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि हा बाबा सुद्धा फक्त महादेवाच्या पिंडीला शहद लावलेले बेलपत्र चिटकवले की मुलगा हा पास होतो. परंतु त्याचा पोरगा नापास झाला. पत्रकारांनी विचारले तेव्हा तो म्हणाला लोकांना हा नुस्का सांगता सांगता मी माझ्या मुलांना सांगायचे विसरलो त्यामुळे तो नापास झाला. या अशा बाबाला देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रभर फिरवतात आणि लोकांच्या अंधश्रद्धा वाढवतात. जादूटोणा कायदा प्रचार प्रसार अंमलबजावणी समिती तयार करण्यात आली आणि मानव त्याचे सहअध्यक्ष आहेत. उद्धव ठाकरेच्या काळामध्ये दहा कोटी रुपये अजितदादांनी मंजूर केले आणि लॉकडाऊन लागले. दोन वर्षे गेली त्यानंतर पुन्हा कामाला सुरुवात केली आणि सरकार पडले. नंतर पुन्हा फडणवीस आले. फडणवीस यांना त्यांच्या घरी जाऊन या कायद्याच्या संदर्भात अंमलबजावणी आपण करणार आहात का तर त्यांनी सांगितले. परंतु तीन वर्षे त्यांनी काहीही केले नाही. नंतर अजित दादा आले. अजित दादांना भेटलो 14 कोटीचा त्यांनी निधी मंजूर करून दिला. परंतु मी स्वतः चकरा मारू मारू थकून गेलो. पण जीआर निघाला नाही तेव्हा मला सांगण्यात आले की हे काम काही असे होणार नाही त्यासाठी तुम्हाला दहा टक्के एक प्रकारची लाच द्यावी लागेल. मानवांनी सांगितले की मला लाच मागायची तुमची हिम्मत कशी झाली. उद्धव ठाकरे यांचं अडीच वर्षाचे सरकार आणि त्यातला कोरोना सोडला तर सलग आपल्या महाराष्ट्राचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री असले तरी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आहे आणि त्यांनी या जादूटोणाविरोधी कायदा बद्दल कुठल्याही प्रकारचे काम केले नाही, करू दिले नाही. ऑलरेडी पोलिसांचे प्रशिक्षण झाले होते ते मुख्यमंत्री असताना. नंतर शिक्षकाचे प्रशिक्षण करायचे होते अंगणवाडीच्या सेविका, असा खूप मोठा व्यापक विषय हा प्रचार आणि प्रसाराचा करायचा होता आणि हे सगळे जर केले असते तर हा अशोक खरात नावाचा बाबा इतका मोठा झालाच नसता आणि त्यांनी जे आपल्या स्त्रियांचे शोषण केले ते एवढ्या मोठ्या प्रमाणावर तो शोषण करू शकला नसता. त्यामुळे अशोक खरातसारखा बाबा जो बाहेर आलेला आहे असे अनेक बाबा आहेत, जे आजही मोठ्या प्रमाणावर महिलांचे शोषण करतात आणि लोकांना अंधश्रद्धेमध्ये ढकलतात. त्यामध्ये प्रदीप मिश्रा, वीरेंद्र कृष्ण महाराज यांना स्वतः भाजपच महाराष्ट्रामध्ये आणतो आणि लोकांच्या अंधश्रद्धा वाढवते. त्यामुळे खरात सहित जे जे बाबा असतील त्यांनी जे महिलांचे शोषण केले. लोकांच्या अंधश्रद्धा वाढवल्या आणि हे भयंकर प्रकार पुढे आले. याचे सगळ्यात मोठे पाप जर कोणी केले असेल तर ते देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे, असे श्याम मानव म्हणाले. फक्त लोकांच्या अंधश्रद्धा वाढवूनच निवडून येता येते असे नाही तर लोकांचे चांगले काम करूनही आपण निवडून येऊ शकतो आणि म्हणून लोकांचे चांगले काम करा जर तुम्ही हा जादूटोणा विरोधी कायदा नीटपणे राबवला नाही तर आपण हा महाराष्ट्र नासवला असे म्हणून एक खलपुरुष म्हणून तुमची इतिहासात नोंद होईल. ■ ■



हेमंत टाले
मो. 9975807632

# अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरण

**अनुसूचित जाती (SC) आरक्षण आणि त्यातील उपवर्गीकरण हा सध्या देशात चर्चेचा महत्त्वाचा विषय ठरत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील निकालात असे नमूद करण्यात आले आहे की, आरक्षणाचा लाभ ज्या जातींपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहोचलेला नाही, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारांनी उपवर्गीकरणाचा विचार करू शकतो.**

सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने दिलेल्या या निकालात सहा न्यायाधीशांनी उपवर्गीकरणाला समर्थन दिले, तर एका न्यायाधीशाने त्यास विरोध दर्शविला. या निर्णयानुसार, राज्यांना वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे धोरण आखण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. आरक्षण व्यवस्थेचा मूळ हेतू समजून घेतल्यास, या विषयातील अनेक गैरसमज दूर होऊ शकतात. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील ऐतिहासिकदृष्ट्या वंचित घटकांना न्याय मिळावा यासाठी ओबीसी, एससी आणि एसटी असे प्रवर्ग निर्माण केले. या प्रवर्गांद्वारे समान संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश होता. प्रत्येक प्रवर्गात अनेक जातींचा समावेश आहे आणि त्या सर्वांना समान पातळीवर आरक्षणाचा लाभ दिला जातो.

उदाहरणार्थ, अनुसूचित जाती प्रवर्गात विविध जातींचा समावेश आहे. जेव्हा या प्रवर्गासाठी जागा निघतात, तेव्हा त्या कोणत्याही एका जातीसाठी नसून संपूर्ण प्रवर्गासाठी असतात. त्यामुळे त्या जागांसाठी सर्व जातींमधील उमेदवार स्पर्धा करतात आणि ज्या उमेदवाराचे गुण अधिक असतात, त्याची निवड होते. त्यामुळे एखाद्या विशिष्ट जातीने इतर जातींच्या जागा 'बळकावल्या' असा आरोप करणे वस्तुस्थितीला धरून नाही.

विशेषतः काही ठिकाणी महार समाजावर असा आरोप केला जातो की त्यांनी इतर मागासलेल्या जातींच्या जागा घेतल्या. परंतु, हे आकलन चुकीचे आहे. कारण जागा या जातीवर आधारित नसून प्रवर्गावर आधारित असतात. त्यामुळे सर्वांना समान संधी असते. मेहनत, गुणवत्ता आणि स्पर्धा या निकषांवर निवड होत असते. अशा परिस्थितीत एका जातीवर दोषारोप करणे म्हणजे समाजात द्वेष आणि फूट निर्माण करण्याचा प्रयत्न होय.

याउलट, एक महत्त्वाची बाब अशी आहे की अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या अनेक जागा अजूनही रिक्त आहेत. शासनाच्या विविध विभागांमध्ये - जसे की पंचायत समिती, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, वीज विभाग इत्यादी, अनेक पदे भरली गेलेली नाहीत. त्याऐवजी कंत्राटी पद्धतीने कामकाज चालवले जात आहे. ही परिस्थिती आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच बाधा आणणारी आहे. म्हणूनच, समाजातील विविध घटकांनी एकमेकांवर आरोप - प्रत्यारोप करण्याऐवजी या रिक्त पदांच्या भरतीसाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. आरक्षणाच्या जागा पूर्ण क्षमतेने भरल्या गेल्यास आणि त्याचा लाभ खऱ्या अर्थाने वंचित घटकांपर्यंत पोहोचल्यासच सामाजिक न्यायाची संकल्पना साकार होईल.



अविनाश टिपले
मो. 9970917389




उपवर्गीकरणाच्या मागणीबाबतही सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. जर संपूर्ण प्रवर्गातील बहुतांश जातींनी उपवर्गीकरणाची मागणी केली, तर त्यावर विचार होऊ शकतो. परंतु, केवळ एक-दोन जातींच्या मागणीवर आधारित निर्णय घेतल्यास समाजात अधिक विभाजन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा निर्णयांमध्ये व्यापक अभ्यास, आकडेवारी आणि सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे. आरक्षणाचा लाभ कोणाला किती मिळाला आणि कोण वंचित राहिला, यासाठी कोणतीही एक जात जबाबदार नाही. यामागे अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक घटक कारणीभूत आहेत. त्यामुळे या प्रश्नाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. समाजात एकोपा टिकवून ठेवणे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे हेच संविधानाचे खरे ध्येय आहे. आजही अनेक मागासवर्गीय समाजांना आपले मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांची पुरेशी जाणीव नाही.

यामुळे आरक्षण असूनही त्याचा अपेक्षित लाभ मिळत नाही. त्यामुळे जनजागृती, शिक्षण आणि संघटन यावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाने एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी लढा दिल्यासच खरी प्रगती साध्य होईल. शेवटी, 'अनुसूचित जातीचे आरक्षण आणि उपवर्गीकरण' या विषयाकडे पाहताना भावनिकतेपेक्षा तर्कशुद्ध आणि संविधानिक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. कोणत्याही एका जातीला लक्ष्य करून समाजात फूट पाडणे टाळले पाहिजे. सर्व घटकांनी एकत्र येऊन समान न्याय, समान संधी आणि सामाजिक समता या मूल्यांना बळ द्यावे, हीच काळाची गरज आहे. ■ ■

